१९३७-२०२६ वर्षे ९०

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड गुरुवार । दि. १ ऑक्टोबर २०२६ । अंक ११५ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## पूर्णेकरांची गोळ्या झाडून हत्या

**ठाणे :** ठाण्यातील मनोरमा नगर परिसरात ठाकरे गटाच्या शिवसेनेचे विभागप्रमुख प्रदीप पुर्णेकर यांच्यावर गोळीबार करून धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या पुर्णेकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री साडेनऊच्या सुमारास मास्क बांधून आलेल्या हल्लेखोरांनी पुर्णेकर यांच्यावर चार राऊंड फायरिंग केली. त्यातील दोन गोळ्या पुर्णेकर यांना लागल्याची प्राथमिक माहिती आहे.

## ३ हजार कोटींचे ड्रग्ज; पाकिस्तानी ताब्यात

**मुंबई :** अरबी समुद्रात तटरक्षक दल आणि गुजरात एटीएसने मोठी कारवाई करत ३ हजार कोटींपेक्षा अधिक किमतीचे ५२६ किलो अंमली पदार्थ जप्त केले. लक्षद्वीपच्या पश्चिमेला संशयास्पद इराणी बोट अडवून ही कारवाई करण्यात आली. बोटीवर असलेल्या पाच पाकिस्तानी नागरिकांना ताब्यात घेण्यात आले असून बोट, आरोपी आणि जप्त अंमली पदार्थ मुंबईत आणण्यात आले आहेत. या कारवाईत समुद्र आणि हवाई देखरेखीच्या माध्यमातून संशयास्पद बोटीचा माग काढण्यात आला. त्यानंतर तटरक्षक दलाच्या पथकाने बोटीचा पाठलाग करून झडती घेतली.




# निवडक

## स्नेहभोजनाच्या कार्यक्रमात नाट्यसंवादांचा आवाज



**चिरनेर** :एकेकाळी नाटकात अभिनयाचे रंग उधळत असताना, रसिकांच्या प्रेमामुळे माझा नाट्यप्रवास सतत उंचावत राहिला. त्याकाळी नाटकात तंत्रज्ञ नसताना, अभिनयाच्या जोरावर नाट्यप्रयोग गाजायचे. आणि यातूनच ग्रामीण कलाकारांनी ग्रामीण रंगभूमी समृद्ध केली. माझ्या प्रत्येक छोट्या मोठ्या भूमिका या गाजल्या. आज माझे वय ७१ आहे, मात्र तुम्हा कलाकारांचे नाट्यकलेवर असलेले प्रेम आणि तुमचा माझ्यावर असलेला विश्वास त्यामुळे तुमच्या आग्रहाचा मान ठेवून, नाटकासाठी मला शक्य होईल, तेवढे मी तुम्हाला मार्गदर्शन करीत राहीन, असे कृतार्थ उद्गार ज्येष्ठ दिग्दर्शक प्रमोद पाटील यांनी काढले. खोपटे येथील नाटककार धनेश्वर म्हात्रे यांनी नाट्य परिवारातील कलाकार मित्रांसाठी रविवारी (दि.२७) स्नेहभोजनाचे आयोजन त्यांच्या खोपटे गावी केले होते. यावेळी कृष्णकांत म्हात्रे, दत्तात्रेय घरत, अशोक म्हात्रे, महेंद्र खैरे, धनेश्वर म्हात्रे, दत्तात्रेय म्हात्रे, हर्षल म्हात्रे यांनीही अभिनयातून एकपात्री अभिनयाचे सादरीकरण केले.

## रेड रिबन क्लब अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण



**रायगड** : आयुक्त (शहरी आरोग्य) तथा प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई डॉ.सुनील भोकरे व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार व उपसंचालक (आयईसी) तथा पालक अधिकारी (डापकु रायगड), महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई रोशनी कदम यांच्या नियोजनानुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग संजय माने व जे.एस.एम. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील २४ महाविद्यालयातील रेड रिबन क्लबचे नोडल अधिकारी व पीअर एज्युकेटर यांचे प्रशिक्षण जे.एस.एम. महाविद्यालय अलिबाग येथील सभागृहात संपन्न झाले. यावेळी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी महाविद्यालयातील नोडल अधिकारी व पीअर एज्युकेटर यांना एचआयव्ही, एड्स विषयी जाणीव, जागृती होण्याकरिता व त्यांना संसर्गापासून सुरक्षित ठेवण्याकरिता रेड रिबन क्लबचा सहभाग कसा महत्वाचा आहे व त्यांचे कार्य कशाप्रकारे करावयाचे आहे हे सांगितले.

## कर्जतमध्ये भाजीची घाऊक दरात विक्री

**कर्जत** : कर्जत तालुका हा आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो पूर्वी स्वतःसाठी भाजी पिकून किंवा मासेमारी करून आपला उदरनिर्वाह करत असत. आता आदिवासी बांधव आपल्या घराच्या बाजूला भाज्यांची लागवड करून या भाज्या कर्जत तालुक्याच्या ठिकाणी सकाळच्या प्रहरी येऊन विकतात. यातील काही महिला त्यांच्याकडून घाऊक भावाने भाजी



घेऊन बाजारपेठेत दिवसभरात किरकोळ दराने विक्री करत असतात. मात्र पहाटे सहा वाजताच कर्जत बाजारपेठेत आलेल्या आदिवासी महिला आपल्या टोपलीतील भाजी किंवा पोत्यातील भाजीचा एक रक्कमेत म्हणजेच घाऊक दरात विक्री करून ते आपल्या गावी परत जातात आहे. मळ्यातील कामे करतात. आदिवासी बांधव प्रामुख्याने निसर्गाच्या सानिध्यात वाढणाऱ्या रानभाज्या गोळा करतात आणि काही पारंपरिक पिकांची शेती करतात. पावसाळा सुरू झाला की जंगलात, डोंगराच्या कड्याकपारीत आणि शेताच्या कडेला अनेक प्रकारच्या अत्यंत पौष्टिक आणि औषधी वनस्पती नैसर्गिकरित्या उगवतात, ज्यांना आदिवासी संस्कृतीत विशेष स्थान आहे. आदिवासी बांधव गोळा करत असलेल्या आणि पिकवत असलेल्या प्रमुख भाज्यांमध्ये शेवळा, टाकळा, फोडशी किंवा कोली भाजी, करटोली, भारंगी, कवळ आणि चाई, बांबूचे कोंब या भाज्यांचा समावेश आहे.

## ट्रेनमधून पडून अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

**कोलाड** : कोलाड पोलीस ठाणे हद्दी मध्ये कोकण रेल्वे मार्गावर गोवे गावाच्या हद्दीत गोवा बाजूकडून मुंबई बाजूकडे जाणाऱ्या अपलाईन दरम्यान रेल्वे पटरीवर एक अनोळखी व्यक्ती पडल्याची माहिती मिळताच कोलाड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृताचे नाव अद्याप समजले नाही. या घटनेची नोंद कोलाड पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यू म्हणून करण्यात आली आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. पुढील तपास कोलाड पोलीस ठाणे सहायक पोलीस निरीक्षक भारत फार्णे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उप निरीक्षक के. एस. नागे करीत आहेत.

# पावती फाडा अन् हातगाडी लावा!

## उरणमध्ये हातगाड्या-टपऱ्यांचा सुळसुळाट; पालिकेच्या जागेवर केले अतिक्रमण

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपरिषद हद्दीत पावती फाडा आणि शहरात कुठेही गाडी लावून व्यवसाय करा, अशीच काहीशी परिस्थिती निर्माण झाल्याची जोरदार चर्चा शहरात सुरू आहे. शहरातील रस्ते, चौक, फुटपाथ आणि सार्वजनिक जागांवर छोट्या-मोठ्या टपऱ्या व हातगाड्यांचे जाळे वाढत असताना त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या पालिका प्रशासनाच्या कारभारावरच आता प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

उरण नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारापासूनच टपरीराज सुरु होत आहे. आजच्या घडीला उरण शहरात तब्बल दोन ते अडीच हजारांच्या आसपास टपऱ्या व हातगाड्या कार्यरत असल्याची चर्चा आहे. यातील काही दुकानदारांनी आपल्या दुकानासमोरील जागेत टपऱ्या उभारून त्या तब्बल ७ ते १० हजार रुपये महिन्याला भाड्याने दिल्याचे बोलले जाते. पालिकेच्या जागेचा वापर करून खासगी व्यक्तीने भाडे वसूल करायचे आणि पालिकेच्या तिजोरीत मात्र नाममात्र महसूल जमा व्हायचा, असे असेल तर हा प्रकार म्हणजे कुंपणच शेत खात आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.



पालिकेच्या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करून माल विक्रीसाठी ठेवला जात असल्याच्या तक्रारी आहेत. एवढेच नव्हे तर पालिकेच्या जागेवरच बेकायदेशीर दुकान उभारून व्यवसाय सुरू असल्याचा आरोपही केला जात आहे. मग अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाईचा हात का उठत नाही? प्रशासनाला हे अतिक्रमण दिसत नाही की दिसूनही डोळेझाक केली जाते, असा सवाल उरणकर विचारत आहेत.

दुसरीकडे नगरपरिषदेकडून दररोज फेरीवाल्यांकडून पावत्या फाडल्या जात असल्याचे सांगितले जाते. मात्र या पावत्यांच्या माध्यमातून प्रत्यक्षात पालिकेच्या तिजोरीत किती महसूल जमा होतो, किती पावत्या फाडल्या जातात, किती रक्कम वसूल होते आणि त्याचा अधिकृत हिशोब काय, याची माहिती जनतेसमोर येणे गरजेचे आहे. पावती फाडणारा कर्मचारी वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी का? महसूल वसुलीची जबाबदारी असलेली व्यक्ती दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत असेल तर त्या वसुलीची स्वतंत्र तपासणी, पावती पुस्तकांचा ताळमेळ आणि बँक जमा रकमेची पडताळणी करण्याची वेळ आली आहे. पावती पुस्तकापासून पालिकेच्या तिजोरीपर्यंत पैशाचा प्रवास पारदर्शक आहे का? याचे उत्तर पालिका प्रशासनाने द्यावे, अशी मागणी होत आहे.

शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि नाक्यांवर हातगाड्या उभ्या राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. वाहतूक पोलीस, पोलीस प्रशासन आणि नगरपरिषद यांच्या बैठका होतात, कारवाईची आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात हातगाड्या कमी होण्याऐवजी वाढताना दिसत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. उरण शहराचा विकास झपाट्याने होत असताना नियोजनाशिवाय वाढणाऱ्या फेरीवाला व्यवसायामुळे शहराच्या वाहतुकीवर आणि सार्वजनिक जागांवर मोठा ताण येत आहे. स्थानिक असो वा बाहेरून आलेला कायद्याचे नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. परवाना, नोंदणी, जागेची परवानगी, अतिक्रमण आणि कर वसुली यांची एकत्रित तपासणी झाली तर शहरातील नेमके चित्र समोर येऊ शकते. आठवडा बाजारामुळेही वाहतूक आणि नागरिकांच्या दैनंदिन हालचालींवर परिणाम होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे बाजाराचे नियोजन, विक्रेत्यांची नोंदणी, जागेचे नियमन आणि वाहतूक व्यवस्थापन याबाबत प्रशासनाने ठोस धोरण राबविणे आवश्यक आहे.

## मेंदडी शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

माहिती अधिकार दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हा परिषद शाळा मेंदडी येथे विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व जनजागृतीपर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषद सदस्य अनिल बसवत, पंचायत समिती म्हसळा उपसभापती लहु म्हात्रे, ॲड. शुभांगी भुनेसर, केंद्रप्रमुख किशोर मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत पायकोळी, मोरेश्वर पाटील, तुळशीराम पाटील, मधुकर पाटील, सचिन भुनेसर यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

माहिती अधिकार दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त





सहभाग घेतला.

स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना माहितीचा अधिकार कायदा, नागरिकांचे मूलभूत हक्क, शासकीय कामकाजातील पारदर्शकता तसेच जबाबदारीची जाणीव करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून व वक्तृत्वातून माहिती अधिकाराचे महत्त्व मांडले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत माहितीचा अधिकार हा लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचा आधारस्तंभ असून, त्याचा योग्य आणि जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता आपल्या हक्कांविषयी जागरूक राहावे, तसेच समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांनी कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. शाळेच्या वतीने राबविण्यात आलेल्यायाउपक्रमामुळेविद्यार्थ्यांना माहिती अधिकाराच्या संकल्पनेची ओळख होऊन सामाजिक व नागरिकत्वाच्या जाणीवा विकसित होण्यास मदत झाली.

## उरणमध्ये डेंग्यू-मलेरियाचा डंख

**। उरण । प्रतिनिधी ।**

ऊन-पावसाच्या बदलत्या वातावरणामुळे उरण तालुक्यात डेंग्यू, मलेरिया, ताप, सर्दी-खोकला, उलट्या-जुलाब यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढत असल्याची माहिती समोर येत आहे. मागील महिनाभरात डेंग्यूचे अनेक रुग्ण आढळल्याचा दावा केला जात आहे.

आरोग्य विभागाकडून ग्रामपंचायतींना स्वच्छता व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सूचना दिल्या जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, सूचना देऊनही नियमित स्वच्छता, साचलेले पाणी हटविणे आणि डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करण्याची प्रभावी कार्यवाही होत नसल्याच्या तक्रारी गावागावातून पुढे येत आहेत. त्यामुळे रोगराई रोखण्याची जबाबदारी केवळ आरोग्य विभागावर टाकून चालणार नाही, तर ग्रामपंचायतींनीही जबाबदारीने काम करण्याची गरज आहे.

वाढत्या रुग्णसंख्येमुळे आरोग्य यंत्रणेवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे. उरणसारख्या मोठ्या तालुक्यात एकच ग्रामीण रुग्णालय आणि एकच प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने वाढत्या रुग्णांना पुरेशा आरोग्य सुविधा देताना अडचणी निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाने उरण तालुक्यात अतिरिक्त प्राथमिक आरोग्य केंद्रे, डॉक्टर, परिचारिका, आवश्यक कर्मचारी आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, उरणमधील काही खासगी दवाखाने रुग्णांनी फुल्ल झाल्याचे सांगितले जात असून, काही ठिकाणी जागेअभावी रुग्णांना जमिनीवर ठेवून सलाईन व उपचार केल्याच्या तक्रारीही पुढे आल्या आहेत. या तक्रारींची आरोग्य विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून सत्यता तपासावी. तसेच डॉक्टरांची वैद्यकीय पात्रता, नोंदणी आणि दवाखान्यांच्या सुविधांची तपासणी करून अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

उरण शहरासह चाणजे, जासई, कोप्रोली, चिरनेर, कळंबुसरे, विंधणे, करळ, सोनारी, चिर्ले, आवरे, वशेणी, बांधपाडा, पिरकोन, सारडे, नवघर, वेश्वी, बेलपाडा आदी परिसरात स्वच्छता आणि डास प्रतिबंधक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे.

## अंत्यविधीवेळी ग्रामपंचायत पोहोचणार दारी !

**। तळा । प्रतिनिधी ।**

- चरई खुर्द ग्रामपंचायत अंत्यविधी सहाय्य योजना
- तीन हजार रूपयांचा मदतीचा हात

सामाजिक संदेश देणारा अभिनव उपक्रम तळा तालुक्यातील चरई खुर्द ग्रामपंचायतीने हाती घेतला आहे. ग्रामपंचायत हद्दीतील एखाद्या नागरिकाचा मृत्यू झाल्यास संबंधित कुटुंबीयांना अंत्यविधीसाठी ३ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्याची अंत्यविधी सहाय्य योजना सुरू करण्याचा ठराव ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत तसेच ग्रामसभेत मंजूर करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ यांच्यातील सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या प्रचलित नियमानुसार ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांच्या मृत्यूची नोंद विहित मुदतीत, म्हणजेच ७ दिवसांच्या आत ग्रामपंचायत कार्यालयात करणे आवश्यक आहे. अनेकदा दुःखाच्या प्रसंगी कुटुंबियांचे मानसिक संतुलन बिघडल्याने किंवा इतर कारणांमुळे मृत्यूची नोंद वेळेत करण्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते.

त्यामुळे मृत्यूची नोंदणी वेळेत व्हावी आणि संबंधित कुटुंबाला ग्रामपंचायतीकडून तातडीचा आधार मिळावा, या दुहेरी उद्देशाने योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या घरी ग्राम पंचायतीच्या माध्यमातून जाऊन मृत्यू दाखला आणि ३ हजार रुपयांच्या आर्थिक सहाय्याचा धनादेश सुपूर्द करण्याचा मानस आहे. या उपक्रमाची संकल्पना सरपंच प्रविण आंबार्ले यांनी मांडली. त्यांच्या संकल्पनेला ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्वानुमते प्रशासनाचे नाते संवेदनांशी जोडले जावे, दुःखाच्या प्रसंगी ग्रामपंचायत कार्यालयात हेलपाटे मारण्य ऐवजी ग्रामपंचायतच संबंधित कुटुंबियापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात आहे.

## आरएसपी रायगडचा बंदोबस्तात सहभाग

**। अलिबाग । वार्ताहर ।**

अनंत चतुर्दशीच्या गणपती विसर्जन मिरवणुकीच्या पोलीस बंदोबस्तात रायगड जिल्हा वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण संघटनेने आपला सहभाग नोंदविला. ही परंपरा मागील पंधरा वर्षांपासून सुरू आहे.



अलिबागमध्ये अनंत चतुर्दशीच्या सार्वजनिक गणपतींची संख्या मोठी असते. त्याचबरोबर वैयक्तिक घरगुती गणपतींची संख्या ही खूप मोठी असते. याचा विचार करून अलिबाग नगर परिषद दरवर्षी मोठ्या प्रमाणात जय्यत तयारी करते. यात विशेषत: पुरेशी लाईट व्यवस्था, कृत्रिम तलाव, समुद्रात गणेश विसर्जनासाठी होड्या व लाईफ गार्ड्स तसेच शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच वाहतूक व गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येतो. पोलिसांना सहकार्य करण्यासाठी होमगार्ड व आरएसपी तैनात असते. पोलीस विभागाच्या मान्यतेने आरएसपीचे राज्यस्तरीय कायदेशीर सल्लागार ॲड.के. डी.पाटील,कोकण विभागीय समादेशक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. संदीप वारगे, संजय डोंगरे, रमेश पाटील, किशोर राठोड, जिल्हा समादेशक आर.डी.नाईक, रविंद्र वाघमारे, केदार पाटील उपस्थित होते. यावेळी नगरपालिकेच्या वतीने सर्वांचे स्वागत करण्यात आले. सर्वांनी आपापली कर्तव्ये व्यवस्थित पार पाडल्यामुळे नगर परिषदेच्या वतीने आभार मानले.

## ३४ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल** : स्कॅनर स्कॅन करून पेमेंट झाले असे सांगून ३४ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. ललित वजन सिंग तवर यांचे ज्वेलर्सचे दुकान आहे. या सोन्याच्या दुकानात जाऊन आरोपीने खरेदी केली आणि त्यापैकी ६३ हजार रुपये रोख रक्कम देऊन ३४ हजार गुगल पेद्वारे करतो असे सांगून फसवणूक केली.

## ‘बाल अभिव्यक्ती’ विद्यार्थी निर्मित पुस्तकाचे प्रकाशन

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वरई येथे केंद्रीय शिक्षण परिषद संपन्न झाली.या परिषदेत माझा नवोपक्रम विद्या बाल अभिव्यक्ती नावाची पुस्तिका तयार केली. या पुस्तिकेमध्ये विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तुपासून नाविन्यपूर्ण शैक्षणिक साहित्य तयार केले.

विद्यार्थ्यांनी गणपती उत्सवामध्ये आपल्या साहित्याचा वापर गावातील उत्सव मंडळात केला. विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक



आजच्या शिक्षण परिषदेमध्ये करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक सगणे आणि केंद्रीय आदर्श उपक्रमशील शिक्षिका केदारी यांनी विद्यार्थ्यांना अनम ोल मार्गदर्शन केले. सगणे यांनी पुस्तक बाल अभिव्यक्तीचे नामकरण केले. बाल अभिव्यक्ती पुस्तिकेचे प्रकाशन शिक्षण विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख नारायण सोनवणे माथेरानकर यांच्या हस्ते करण्यात आले.

**उद्यानांसाठी होणार खताचा वापर** | **कर्मचाऱ्यांचे उत्तम नियोजन**

# पनवेल पालिकेच्या निर्माल्य खत रथाला प्रतिसाद

**। खांदा । वार्ताहर ।**

गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात जमा होणाऱ्या निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावत त्यापासून खतनिर्मिती करण्याचा पर्यावरणपूरक उपक्रम पनवेल महानगरपालिकेने यंदाही प्रभावीपणे राबविला. दीड दिवस, पाच दिवस, गौरी-गणपती, सात दिवस आणि अकरा दिवसांच्या गणेशमूर्ती विसर्जनादरम्यान जमा झालेले निर्माल्य मोठ्या प्रमाणावर संकलित करून त्याचे कंपोस्ट करण्यात आले. या प्रक्रियेतून तयार होणाऱ्या खताचा वापर महापालिकेच्या उद्यानांसाठी करण्यात येणार आहे.



### स्वच्छतादूतांची महत्त्वाची भूमिका

गणेश विसर्जनाच्या काळात भाविकांची मोठी गर्दी असतानाही निर्माल्य वेगळे संकलित करण्यासाठी स्वच्छता दूतांनी घाटांवर आणि विविध भागांत विशेष काम केले. मंडळे, सोसायट्या आणि नागरिकांनीही त्यांना सहकार्य केल्यामुळे मोठ्या प्रमाणात निर्माल्य संकलित करून त्याचे कंपोस्टिंग करणे शक्य झाले.

निर्माल्य संकलनासाठी महापालिकेने विशेष निर्माल्य खत रथ सुरू केला होता. या रथाला शहरातील गणेश मंडळे तसेच मोठ्या सोसायट्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी फुले, हार, दुर्वा तसेच अन्य निर्माल्य स्वतंत्रपणे देत या उपक्रमाला हातभार लावला. विसर्जन घाटांवरही निर्माल्य वेगळे संकलित करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. काही ठिकाणी निर्माल्याच्या कंपोस्टिंगसाठी विशेष खड्डे तयार करण्यात आले होते. त्यामध्ये संकलित निर्माल्यावर प्रक्रिया करून मोठ्या प्रमाणावर सेंद्रिय खतनिर्मिती करण्यात आली. त्यामुळे निर्माल्य थेट कचऱ्यात न जाता त्याचा पुनर्वापर शक्य झाला आहे. या संपूर्ण उपक्रमासाठी आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि स्वच्छता दूतांनी गणेशोत्सवाच्या काळात मोठी मेहनत घेतली. आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले. तसेच स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर यांच्यासह कर्मचाऱ्यांनी निर्माल्य संकलन, वर्गीकरण व कंपोस्टिंग प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली.

## विकासकामांच्या फलकांवर पक्षीय पदाधिकाऱ्यांची नावे टाकण्यास बंदीची मागणी

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

शासकीय निधीतून होणाऱ्या विकासकामांच्या ठिकाणी लावण्यात येणाऱ्या फलकांचा वापर राजकीय प्रसिद्धीसाठी केला जात असल्याचा आरोप करत, अशा प्रकारांना तातडीने आळा घालावा, अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील वेळास येथील समाजसेवक धवल तवसाळकर यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

शासकीय विकासकामांच्या फलकांवर राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची नावे नमूद करण्यास प्रतिबंध करून संपूर्ण राज्यासाठी एकसमान नियम लागू करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री व रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच इतर शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून विविध विकासकामे केली जातात.या कामांच्या ठिकाणी लावण्यात येणाऱ्या फलकांवर कामाची माहिती, निधीचा स्रोत, कामाची किंमत आदी अधिकृत माहिती देणे अपेक्षित असते.मात्र, अनेक ठिकाणी या फलकांवर राजकीय पक्षांचे तालुका, शहर, जिल्हा पातळीवरील पदाधिकारी किंवा इतर पक्षीय पदाधिकाऱ्यांची नावे आढळत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक पैशातून होणाऱ्या कामांचे श्रेय राजकीय प्रसिद्धीसाठी नको, अशी भूमिका तवसाळकर यांनी मांडली आहे.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष



रायगड | गुरुवार | दि. १ ऑक्टोबर २०२६ | अंक ११५ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

## सागरी सुरक्षेसाठी पोलीस अलर्ट मोडवर



**रायगड :** सागरी सुरक्षेसाठी रायगड पोलीस अलर्ट मोडवर आले आहेत. बुधवारी (दि.३०) सकाळी सहा पान ५ वर

## दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ

रायगड : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. फेब्रुवारी–मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांकडून कोणतेही परीक्षा शुल्क घेतले जाणार नाही. दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मदत व पुनर्वसन विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार ही सवलत लागू करण्यात आली आहे. शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी यासंदर्भातील अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध करून सर्व विभागीय मंडळांना तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. पान ५ वर

# भारतीय लेकींची सुवर्णझळाळी

| नागोया | प्रतिनिधी |

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या ॲथलेटिक्स ट्रॅकवर भारतीय महिला धावपटूंनी दिमाखदार कामगिरी करत देशाला आणखी एक सुवर्णपदक मिळवून दिले. महिलांच्या ४४०० मीटर रिले शर्यतीत भारताने सुवर्णपदकावर नाव कोरले.

किरण, मचेत्तिरा पूवम्मा, प्राची आणि विथ्या रामराज यांच्या चौकडीने ३ मिनिटे २९.६९ सेकंदांत शर्यत पूर्ण करत अव्वल स्थान पटकावले. हे २०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचे सहावे सुवर्णपदक ठरले. भारतीय संघाने सुरुवातीपासूनच पदकाच्या शर्यतीत आपले स्थान कायम ठेवले. सहाव्या लेनमधून भारताची रिले सुरू झाली. पहिल्या टप्प्यात किरणने धाव घेत बॅटन पूवम्माकडे सोपवले. सुरुवातीला भारत तिसऱ्या स्थानावर असला तरी अनुभवी पूवम्माने दुसऱ्या टप्प्यात वेग वाढवत भारताला आघाडीच्या शर्यतीत आणले. त्यानंतर बॅटन प्राचीकडे सोपवण्यात आले. यापूर्वी ४०० मीटरमध्ये कांस्यपदक जिंकलेल्या प्राचीने तिसऱ्या टप्प्यात भारताची स्थिती म जबूत ठेवली. अखेरच्या टप्प्यासाठी विथ्या रामराजकडे बॅटन पोहोचले आणि भारतीय संघाने सुवर्णाकडे झेप घेतली. विथ्याची झंझावाती धाव अंतिम टप्प्यात विथ्याने सुरुवातीला संयम राखत पान ५ वर



### ॲथलेटिक्स ट्रॅकवर भारतीय महिला धावपटूंची दिमाखदार कामगिरी

- भारताने ३:२९.६९ वेळेसह सुवर्णपदक
- बहरीनने ३:३०.२१ वेळेसह रौप्यपदक
- चीनने ३:३१.०२ वेळेसह कांस्यपदक

### पीटी उषा यांचा ४२ वर्षांचा रेकॉर्ड मोडला

महिलांच्या ४०० मीटर अडथळा शर्यतीत विथ्या रामराजने अवघ्या ५४.७५ सेकंदात शर्यत पूर्ण केली. ही तिची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ठरली. या कामगिरीसह तिने १९८४ च्या लॉस एंजिल्स ऑलिंपिकमध्ये पीटी उषा यांनी नोंदवलेला ५५.४२ सेकंदांचा ४२ वर्षे जुना राष्ट्रीय विक्रम इतिहासजमा केला. आता हा राष्ट्रीय विक्रम अधिकृतपणे विथ्या रामराजच्या नावावर नोंदवला गेला आहे.

# 3.82 लाख मतदार रडावर

| रायगड | प्रतिनिधी |

**ज्या मतदारांची नावे २००२ च्या मतदार यादीशी जुळत नाहीत किंवा जुळणी प्रक्रियेत विसंगती आढळलेली आहे. अशा म तदारांना नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत नोटीस बजावण्यात येणार असून सादर करण्यात येणारे पुरावे आणि सुनावणीनंतर संबंधितांबाबत योग्य निर्णय घेण्यात येणार असल्याचे जिल्हा निवडणूक विभागाच्या वतीने सांगण्यात आले. दरम्यान, रायगड जिल्ह्यात २००२ च्या मतदार यादीतील जुळणी प्रक्रियेत विसंगती असणारे ३ लाख ८२ हजार ८४४ मतदार आहेत. या सर्वांना आता नोटीसा धाडण्यात येणार आहेत. ३० सप्टेंबरपर्यंत १ लाख २१ हजार १५६ मतदारांना नोटीस पाठविण्यात आल्या आहेत. २ लाख ६१ हजार ६७५ मतदारांना नोटीस पाठविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.**

रायगड जिल्ह्यात आधीच मयत, स्थलांतरीत अथवा एकापेक्षा अनेक मतदारसंघात म्हणजेच दुबार नावे असणारी मतदार होते. या सर्वांची नावे प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आलेली आहे. या सर्वांना मतदार यादीत पुन्हा नावे टाकण्यासाठी पुन्हा फार्मनंबर ६ आणि ७ भरून द्यावा लागणार आहे. हा अर्ज त्यांना सध्या, एसआयआर कार्यक्रमानंतर किंवा २०२९ निवडणुकीपूर्वीकधीहीभरता येणार आहे. दरम्यान, या शिवाय २००२ च्या यादीतील नावाशी विसंगती असणारी ३ लाख ८२ हजार ८४४ मतदारांची नावे आहे. या सर्वांना आता मतदारसंघनिहाय नोटीस बजावण्यात येणार आहे. तसेच त्यांच्याकडून पुरावा घेण्यात येणार असून मतदार नोंदणी अधिकारी यांच्यावतीने त्यांची सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधीत मतदारांची नावे पुन्हा मतदार यादी घ्याची की नाही, याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.नोटीस पाठविण्यात आलेल्या मतदारांना सुनावणीसाठी मतदार नोंदणी अधिकारी यांच्या दालनात बोलावण्यात येणार होते. निवडणूक आयोगाच्या नव्या निर्देशानुसार आता नोटीस पाठविण्यात आलेल्या प्रत्येक मतदाराच्या घरी बीएलओ जाऊन त्याचे म्हणणे ऐकून त्या मतदाराचे नाव नोंदणी करण्यात येणार आहे.

सातही मतदार संघातून तब्बल ३ लाख ८२ हजार ८४४ मतदारांना नोटीस पाठविण्यात येणार आहेत. यामध्ये पनवेल १ लाख ५० हजार ४२४ मतदार, कर्जत ३३ हजार २९४ मतदार , उरण ५८ हजार ६९८, पेण ३० हजार ३८१ मतदार , अलिबाग ४२ हजार ७४१ मतदार, श्रीवर्धन २४ हजार ८६० मतदार आणि महाड विधानसभा मतदार संघात ४२ हजार ४३३ मतदारांना नोटीसा पाठविण्यात येणार आहेत.

रायगड जिल्ह्यात १ लाख २१,१५६ मतदारांना नोटीस पाठविण्यात आल्या आहेत. यामध्ये पनवेल ४१ हजार ५७ मतदार, कर्जत १४,९१३ मतदार , उरण ११,२८६ मतदार, पेण १६,६७९ मतदार, अलिबाग ९,७७२ मतदार, श्रीवर्धन १४,८२४ मतदार आणि महाड मतदारसंघात २ हजार ५८५ मतदारांचा समावेश आहे.

### केंद्रांच्या रचनेत आवश्यक बदल

मतदारांची संख्या, मतदान केंद्रांची भौगोलिक स्थिती तसेच मतदारांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा विचार करून केंद्रांच्या रचनेत आवश्यक बदल सुचविण्यात आले आहेत. मतदान केंद्र सुसूत्रीकरण प्रक्रियेत केवळ नवीन मतदान केंद्रांची निर्मितीच नव्हे, तर विद्यमान केंद्रांचे विभाजन व विलीनीकरण करण्याचे प्रस्ताव आहेत. याशिवाय काही मतदान केंद्रांच्या नावात तसेच ठिकाणात बदल प्रस्तावित आहेत. मतदारसंख्या, भौगोलिक स्थिती आणि सुविधांचा विचार करून हे बदल करण्यात येत आहेत. अंतिम निर्णयानंतर रचना स्पष्ट होईल. ज्या ठिकाणी यापूर्वी १ हजार ३०० पेक्षा जास्त मतदार आहेत, अशा मतदान केंद्राचे विभाजन करण्यात येणार आहे.




### काम युद्ध पातळीवर सुरू

रायगड जिल्ह्यातील २ लाख ६१ हजार ६७५ मतदारांना नोटीस पाठविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. यामष्ये पनवेल १ लाख ९ हजार ३२७मतदार, कर्जत १८ हजार ३८१ मतदार, उरण ४७ हजार ४१२ मतदार , पेण १३ हजार ७०२ मतदार , अलिबाग ३२ हजार ९६९ मतदार, श्रीवर्धन १० हजार ३६ मतदार आणि महाड विधानसभा मतदार संघातील २९ हजार ८४८ मतदारांचा समावेश आहे.

## नेरळमधील उपोषणकर्त्याची प्रकृती ढासळली

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ गावातील नागरी प्रश्न घेऊन उपोषण करीत असलेले गोरख शेप यांच्या उपोषणाचा आजचा तिसरा दिवस आहे. मात्र हार्ट पेशंट असलेले उपोषणकर्ते शेप यांची प्रकृती मध्यरात्री ढासळली आणि त्यामुळे कळंब प्राथमिक आरोग्य केंद्रातून वैद्यकीय अधिकाऱ्यांना बोलावून घेण्यात आले.नेरळ ग्रामपंचायत हद्दीत निर्माण झालेले नागरी प्रश्न आणि ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडून गैरव्यवहार झाला असून त्याची चौकशी करावी. या मागणीसाठी मानवाधिकार माहिती अधिकार कार्यकर्ते गोरख शेप यांनी २८ सप्टेंबर पासून उपोषण सुरू केले आहे. १३ विषय घेऊन उपोषण करीत असलेले गोरख शेप हे हृदयरोगाचे रुग्ण आहेत. पान ५ वर

## निवडणूक आयोगाविरोधात इंडिया आघाडी आक्रमक



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कारभारावरून सध्या राजकीय वर्तुळात मोठा वाद पेटला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी एसआयआरच्या निर्णयासह आणखी काही निर्णय मनमानीपणे घेतल्याची बातमी समोर आल्यानंतर देशभरातून ज्ञानेश कुमारांवर मोठ्या प्रमाणात टीका होत आहे. विरोधकांकडून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.३०) इंडिया आघाडीची दिल्लीत महत्वाची बैठक पार पडली आहे. निवडणूक प्रक्रियेतील कथित गोंधळाविरोधात देशव्यापी आंदोलन करण्याबाबत इंडिया आघाडीच्या बैठकीत चर्चा झाली. या बैठकीत निवडणूक आयुक्त ज्ञानेश आणि केंद्र सरकारविरोधातील रणनीती निश्चित करण्यात आली आहे.

- भव्य मोर्चा काढण्याची घोषणा
- आता देशभरात आंदोलनांचं वादळ!

आताइंडियाआघाडीच्यावतीने २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या दरम्यान देशभरातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच ६ ऑक्टोबर रोजी सर्व विरोधी पक्षाचे नेते आणि खासदार निवडणूक आयोगावर पान ५ वर

## कठुआमध्ये गोळीबार; ४ मृत्यू

| कठुआ | वृत्तसंस्था |

जम्मू–काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यात सीआयएसएफच्या एका जवानाने आपल्या सहकाऱ्यांवर अंदाधुंद गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या गोळीबारात चार जवानांचा मृत्यू झाला. घटनेनंतर कठुआ पोलिसांनी आरोपी जवानाला अटक केली असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, काही मुद्द्यांवरून सीआयएसएफच्या जवानांमध्ये वाद झाला होता. याच वादातून गोळीबार झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेत कॉन्स्टेबल रफीक अहमद, कॉन्स्टेबल संदीप कुमार, असिस्टंट कमांडंट अंकित कुमार पांडे आणि सब–इन्स्पेक्टर लक्ष्मण सिंग यांचा मृत्यू झाला.आरोपी जवानाची ओळख अभिदेश सिंग अशी झाली आहे.

## गणपती बाप्पा मोरया...पुढल्या वर्षी लवकर या...



(छायाचित्र : समीर मालोदे)

● साखरचौथ गणपतींचे आगमन झाले. मनोभावे पूजन झाले. भक्तिमय वातावरणात गणपती बाप्पांची सेवा करून बुधवारी गणरायांना पुढच्या वर्षी लवकर येण्याचे साकडे घालण्यात आले. अलिबाग नगरीतील ठिकरूळ नाक्यावरील साखरचौथ गणेशाच्या विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांच्या गजराने अलिबागकरांचे लक्ष वेधले होते.

नगरसेवकांच्या विरोधामुळे भुयारी गटार व घनकचरा व्यवस्थापन योजना स्थगित | खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नांना धक्का

# माणगावसाठी १८३ कोटी मंजूर, योजना नामंजूर!

सलीम शेख

| माणगाव |

माणगाव शहराच्या स्वच्छता, पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या भुयारी गटार योजना आणि घनकचरा व्यवस्थापन योजना स्थगित झाल्याने तब्बल १८३ कोटी रुपयांचा निधी परत जाण्याची वेळ आली आहे. या योजनांना मंजुरी मिळावी यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी प्रयत्न केले होते. मात्र नगरसेवकांनी ठरावाला विरोध केल्याने या दोन्ही महत्त्वाकांक्षी योजना पुढे जाऊ शकल्या नाहीत. भुयारी गटार योजनेसाठी तब्बल १५८ कोटी रुपये जागतिक बँकेच्या माध्यमातून उपलब्ध होणार होते. मात्र जवळपास सर्वच नगरसेवकांनी यासंदर्भातील ठराव नामंजूर केल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे माणगावच्या वाढत्या लोकसंख्येसमोर सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला आहे.

सध्या शहरातील गटारांचे सांडपाणी थेट काळ आणि गोद नदीच्या पात्रात सोडले जात असल्याच्या तक्रारी आहेत. सांडपाण्याच्यानिचऱ्यासाठीप्रभावी व्यवस्था नसल्याने नदीपात्रातील पाणी प्रदूषित होण्याचा धोका निर्माण झाला आहे. पाणी आणि पर्यावरणाचा प्रश्न थेट नागरिकांच्या आरोग्याशी जोडलेला असल्याने भुयारी गटार योजना माणगावसाठी गरजेची असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, या योजनेला विरोध करण्यामागे विविध कारणे असल्याचे सांगितले जाते. योजनेचे काम झाल्यास शहरातील रस्ते म ोठ्या प्रमाणावर खोदले जातील आणि त्यांची दुरुस्ती तातडीने होऊ शकणार नाही, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनींचा प्रश्न निर्माण होईल तसेच नागरिकांवर करांचा अतिरिक्त भार पडू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. त्याऐवजी शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागात स्वतंत्र गटार व्यवस्था उभारावी, अशी नगरसेवकांची भूमिका असल्याचे समजते. विशेष म्हणजे, नगरपंचायतीने घनकचरा व्यवस्थापनासाठी पान ५ वर

घनकचरा व्यवस्थापनाची स्थितीही समाधानकारक नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. शहरातील अनेक भागांत नियमित कचरा संकलन होत नसल्याचे नागरिकांकडून वारंवार सांगण्यात येते. याच पार्श्वभूमीवर घनकचरा व्यवस्थापनासाठी २५ कोटी रुपयांची योजना मंजूर झाली होती. मात्र ही योजनाही नगरसेवकांनी फेटाळून लावल्याचे नगरपंचायतीचे कार्यकारी अधिकारी संतोष माळी यांनी सांगितले.

शेकाप



शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना, सांस्कृतिक आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने...

स्वर्गीय मीनाक्षीताई पाटील स्मृती

भव्य रायगड जिल्हास्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा २०२६

प्रथम येणाऱ्या 50 स्पर्धकांना प्रवेश दिला जाईल.

•प्रथम क्रमांक 15,001/-₹ व आकर्षक चषक
•व्दितीय क्रमांक 11,001/-₹ व आकर्षक चषक
•तृतीय क्रमांक 7,001/-₹ व आकर्षक चषक
•चतुर्थ क्रमांक 5,001/-₹ व आकर्षक चषक
•पंचम क्रमांक 3,001/-₹ व आकर्षक चषक

उतेजनार्थ प्रत्येकी 2001 ची पाच बक्षिसे व चषक

•विषय•
1) आजचा विद्यार्थी आणि उद्याचा भारत
2) रायगडचा विकास आणि जनतेची अपेक्षा
3) सत्तेच्या सिंहासनावर नव्हे, जनतेच्या हृदयात घर करणारी 'ताई', मीनाक्षीताई
4) कलम जब जागती है, तब सत्ता काँपती है
5) मजबुती का नाम महात्मा गांधी
6) जखमी लोकशाहीच्या कपाळावर आशेचे कुंकू लावतीय मी

वार: शनिवार 3 ऑक्टोबर 2026 रोजी
ठिकाण: शेतकरी भवन, अलिबाग
वेळ: सकाळी 9.00 वाजता

•संपर्क•
वेदांत कंटक मो. 8329775531
हर्ष ढवळे मो. 9730817227

स्पर्धेचे नियम व अटी

१. स्पर्धा फक्त मराठी भाषेतून असेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला आपले विचार मांडण्यासाठी ४ + २ अशी सहा मिनिटे देण्यात येतील.
३. सदर स्पर्धा दर्जेदार व स्पर्धकांमध्ये स्पर्धेची शिस्त आणि स्पर्धेचे गांभीर्य राहावे यासाठी प्रत्येक स्पर्धकाकडून १०० रुपये प्रवेश फी घेतली जाईल.
४. प्रत्येक स्पर्धकाला उत्तम दर्जाचा सकाळचा चहा व नाश्ता, दुपारचे जेवण व संध्याकाळी चहा व नाश्ता आयोजकांतर्फे देण्यात येईल.
५. सदर स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १२ वर्षांपासून पुढे कोणताही स्पर्धक सहभागी होऊ शकतो.
६. स्पर्धक रायगड जिल्ह्यातील असावा, व यासाठी त्याचे आधार कार्ड व अन्य रहिवासी कागदपत्र तपासली जातील. तपासणी दरम्यान जर स्पर्धक जिल्ह्याच्या बाहेरचा आढळला तर त्याला तिथल्या तिथे बाद करण्यात येईल.
७. कोणतेही बक्षीस विभागून दिले जाणार नाही.
८. सदर स्पर्धेसाठी उत्तम दर्जाचे आणि पारदर्शी परीक्षक असल्याने परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल.
९. स्पर्धेच्या ठिकाणी कोणतीही गैरवर्तणूक केल्यास त्या स्पर्धकाला स्पर्धेतून बाद करण्यात येईल व त्याचबरोबर आयुष्यभर या स्पर्धेत पुन्हा प्रवेश मिळणार नाही.
१०. ऐनवेळी काही बदल असल्यास आयोजन समिती ते बदल करू शकते.
११. प्रथम येणाऱ्या ५० स्पर्धकांना प्रवेश दिला जाईल.

# पाण्याचे सोंग कसे आणणार

दुष्काळग्रस्तांच्या यादीत नसलेल्या तालुक्यांच्या आमदारांनी तक्रार केल्यानंतर राज्य सरकारने हालचाल केली आहे. आता त्यांचाही समावेश केला जाईल असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. जे द्यायचे आहे ते एका झटक्यात न देता प्रत्येक टप्प्यावर अडवून धरायचे आणि मागणी आल्यानंतरच किंवा आंदोलने झाल्यावरच थोडे थोडे द्यायचे असे या सरकारचे धोरण आहे. तेदेखील या मागण्या स्वपक्षीय आमदारांकडून आल्यामुळेच त्यांचा विचार झाला. अन्यथा, सरकारने नियमांवर बोट ठेवले असते. दरम्यान एल निनोचा परिणाम पुढच्या वर्षी आणखी तीव्र होणार असल्याच्या बातम्या आहेत. खुद्द मुख्यमंत्र्यांनीही तसे सांगितले आहे. डिसेंबर किंवा जानेवारीपर्यंत एल निनोचा प्रभाव कळसाला पोचणार असून त्यामुळे अनेक देशात दुष्काळ पडण्याचा अंदाज आहे. सध्या अमेरिकेत कोलराडो नदीच्या खोऱ्यात भयंकर दुष्काळाची स्थिती आहे. युरोपने कधी नाही असा भाजून काढणारा उन्हाळा अनुभवला आहे. तेथे आपल्यासारखी पाण्याची टंचाई निर्माण होत नाही व अन्नधान्य एरवीही आयातच केले जात असते. त्यामुळे दुष्काळ ही त्यांच्यासाठी केवळ एक पर्यावरणीय घटना असते. आपल्याकडे मात्र दुष्काळाचे भयंकर राजकीय, सामाजिक व आर्थिक परिणाम होत असतात. यंदा महाराष्ट्रातच नव्हे तर कर्नाटकाच्या कावेरी खोऱ्यातही मोठा दुष्काळ निर्माण झाला आहे. तमिळनाडूमध्ये ईशान्य मोसमी पावसावर हवाला ठेवता येतो. कर्नाटकाला तीही आशा नसते. आंध्र प्रदेशातही यंदा मान्सूनचा पाऊस झाला नव्हता. गेल्या आठवड्यात थोडीफार कसर त्याने भरून काढली. याउलट बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये अनेक भागात पूर आले आहेत गुजरातेत यंदा विक्रमी पाऊस झाला. पण मध्य प्रदेशात नक्षत्रे कोरडी गेली. पुढील वर्षी याहूनही स्थिती बिकट असेल असे हवामानशास्त्रज्ञ सांगत आहेत. पाऊसच आला नाही तर पिण्याच्या पाण्याचे काय करणार असा प्रश्न आहे. त्यामुळे आतापासूनच धरणाचे पाणी केवळ पिण्यासाठी राहील असे ठरवले जात आहे. शेती, उद्योग यांना याचा फटका बसणार आहे. त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार आहे. याची पुरेशी जाणीव आपल्याला झाली आहे का हा प्रश्न आहे.

## विसर्जनालाही पाणी नाही

वैभववाडी हा सिंधुदुर्गातील तालुका आहे. तेथे एरवी मुबलक पाऊस असतो. पण यंदा गणपती विसर्जनासाठी ओढ्यांना वा नदीला पाणी नाही अशी अवस्था होती. सह्याद्रीलगतचे घाटाखालचे तालुके रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर इथे अनेक भागात यंदा अवर्षण होते. इकडे रायगडमध्येही पोलादपूर, माणगाव, कर्जतच्या काही भागात हीच स्थिती आहे. श्रीवर्धन, म्हसळा हे तर सरकारने मान्य केलेले दुष्काळी तालुके आहेत. पण पुन्हा सवाल हाच आहे की, सरकार आणि जनता याबाबत पुरेशी जागी झाली आहे काय. याच दरम्यान सरकारचा विकासाचा घोडा पुढे पुढे धावतोच आहे. रायगडच्या पेण, पनवेल, अलिबाग, उरण या तालुक्यांमध्ये तिसरी की चौथी मुंबई उभी करण्याचे बेत जारी आहेत. तिथे डेटा सेंटर्ससारखे प्रचंड पाणी पिणारे प्रकल्प आणले जाणार आहेत. बडे बडे टॉवर्स, फ्लायओव्हर्स इत्यादींचे नियोजन चालू आहे. इथे येत्या पाच-दहा वर्षात कित्येक लाख लोकसंख्या सामावली जाईल असे आराखडे आहेत. यासाठी लागणारे पाणी हे आजूबाजूच्या प्रदेशातून वळवले किंवा खरे तर पळवले जाणार आहे. दिघीमध्ये जहाज बांधणी व जुनी जहाजे तोडण्याचा प्रकल्प उभा राहणार आहे. यासाठी होणारा विकासही पाणी पिणार आहे. हे पाणी कोठून येणार याचा हिशेब जनतेने सरकारकडे मागायला हवा. अन्यथा, दुष्काळाच्या काळात आपलीच गावे सोडून जाण्याची वेळ मूळ कोकणवासियांवर येईल. तिकडे मुंबईमध्येही नवीन पूल, जमिनीखालून रेल्वे इत्यादींचे नियोजन चालू आहे. नरिमन पॉईंट ते भाईंदर आणि पुढे विरार यांच्यादरम्यान सागरी पूल बांधण्याचे चालले आहे. यातून मुंबई व परिसरातील वस्ती अधिकाधिक वाढत जाणार आहे. सध्या आहे याच मुंबईला पाणी पुरवणे कठीण झाले आहे. यंदा मे महिन्यात लागू केलेली दहा टक्के पाणीकपात चालू असून ती बहुदा वाढवावी लागेल. नव्या इमारतींना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. तो एक हजारो कोटी रुपयांचा व्यवसाय झाला असून टँकर माफिया तयार झाले आहेत. पण माफिया झाले तरी ते पाणी कुठून आणणार असा प्रश्न काही वर्षांनी निर्माण होणार आहे. ठाण्यामध्ये रिंग रोड, डेटा सेंटर्स इत्यादींची धूम चालू आहे. त्याला स्थानिक नागरिक जोरात विरोध करत आहेत. पण एकनाथ शिंदे आणि मंडळी हे प्रकल्प रेटून नेणार असे दिसते आहे.

## जनतेनेही शहाणे व्हावे

पैशांचे सोंग आणता येत नाही अशी आजवरची म्हण होती. आपल्या नामचीन राज्यकर्त्यांनी तीही खोटी ठरवली आहे. तिजोरीत खडखडाट असूनही त्यांनी लाडकी बहीण वगैरेंसारख्या योजना चालू ठेवल्याच आहेत. इकडच्या खात्यातला पैसा तिकडे आणि तिकडचा इकडे करून वेळ मारून नेली जात आहे. पण पैशांच्या बाबतीत ते हे करू शकले तरी पाण्याच्या बाबतीत ते करू शकणार नाहीत. पैशांचे सोंग आणले तरी पाण्याचे सोंग आणता येणार नाही. देवेंद्र फडणवीसांनी पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत जलशिवार योजना राबवली. जवळपास दहा हजार कोटी रुपये खर्च करून मोठा गाजावाजा केला गेला. नद्या खोल केल्या गेल्या. त्यांची पात्रे जबरदस्तीने रुंद केली गेली. गाळ काढण्याचे फोटो काढले गेले. यामुळे मराठवाडा आता दुष्काळमुक्त झाला अशी द्वाही फिरवण्यात आली. पण त्या जलशिवारचे नामोनिशाणही कुठे उरलेले नाही. मधल्या काळात काँग्रेस आघाडीच्या सरकारने जलशिवारमधील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचा प्रयत्न केला. पण तोवर त्यांचे सरकारच पडले. फडणवीस आता म्हणतात की, आघाडी सरकारने कामे थांबवल्याने मराठवाड्यात दुष्काळाची अशी अवस्था आहे. मुद्दा असा आहे की, आघाडी सरकार जेमतेम अडीच वर्षे सत्तेत होते. त्यानंतर गेली चार वर्षे शिंदे आणि फडणवीसच सत्तेत आहेत. तरीही ही रड का असा प्रश्न त्यांना करायला हवा. त्याचे उत्तर हेच आहे की, तहान लागली की विहिरीच्या नावाने पब्लिसिटी करायची हेच या सरकारचे वैशिष्ट्य आहे. पण सरकारने आता तरी शहाणे व्हावे. यंदा परिस्थिती गंभीर आहे. जनतेला विश्वासात घेऊन अधिक व्यापक, दूरगामी व सच्चे उपाय करायला हवेत. जनतेनेही आता बोलायला हवे. गणपती गेल्यावर आता नवरात्र व मागाहून दिवाळी येईल. जनतेची श्रध्दा दुखावता कामा नये या नावाखाली जोरजोरात हे उत्सव साजरे केले जातील. अब्जावधी रुपये त्यासाठी खर्ची पडतील. पण यंदा राज्यकर्त्यांनीच संयम दाखवून हे पैसे वाचवण्याचे आवाहन करावे. असे उत्सव न साजरे करण्यामधूनही पाण्याची बचत होणार आहे. जनतेनेही आता सुधारायला हवे. एकीकडे मराठवाड्यात भीषण टंचाई असताना परवा जालन्यामध्ये गणपती विसर्जनाची मिरवणूक चोवीस तास चालू होती. शेकडो मंडळे, त्यांचा कोट्यवधींचा खर्च हे दरवर्षीप्रमाणे पार पडले. आपल्याला गांभीर्य नसल्याचे हे द्योतक आहे.

। विचार

# मातीतील अदृश्य जीव आणि चहाचा सुगंध

***चहाचा खरा स्वाद पानांमध्ये नव्हे तर मातीत असतो. तिथे असंख्य अदृश्य सूक्ष्मजीव दिवस-रात्र कार्यरत असतात. या अदृश्य जीवनाचे संरक्षण करण्यातच भारतीय चहा उद्योगाचे, शेतकऱ्यांचे आणि पर्यावरणाचे भविष्य दडले आहे. म्हणूनच आता मातीच्या आरोग्याकडे कृषी विषय म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय संपत्ती म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. कारण माती जिवंत राहिली, तरच चहाचा सुगंध आणि भारतीय शेतीचे भविष्यही जिवंत राहील.***



**मिलिंद बेंडाळ**

भारतीयांच्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य घटक असलेल्या चहाला कोणत्याही परिचयाची गरज नाही. सकाळची सुरुवात असो, कार्यालयातील कामाचा ताण असो, पाहुणचार असो किंवा मित्रांच्या गप्पा; प्रत्येक प्रसंगात चहाची खास भूमिका असते. भारतातील कोट्यवधी लोकांसाठी चहा हे केवळ पेय नसून भावना, संस्कृती आणि जीवनशैलीचा भाग आहे; परंतु या चहामागे असलेल्या चहाबागांची आणि विशेषतः त्या बागांमधील मातीची अवस्था चिंताजनक बनत चालली आहे. आतापर्यंत हवामानबदलाचा परिणाम पाऊस, तापमान, पूर, दुष्काळ आणि उत्पादनातील घट यापुरताच मर्यादित असल्याचे मानले जात होते; मात्र आता वैज्ञानिक संशोधनाने या संकटाचे आणखी गंभीर रूप समोर आणले आहे.

हवामानबदलाचा परिणाम थेट मातीतील सूक्ष्म जीव आणि एंझाइम्सवर होत असून हेच अदृश्य जीव चहाच्या उत्पादनाचे आणि गुणवत्तेचे खरे आधारस्तंभ आहेत. नागालँड विद्यापीठासह अनेक भारतीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांनी आसाममधील चहाबागांवर केलेल्या बहुवर्षीय अभ्यासाने ही बाब अधोरेखित केली आहे. संशोधकांनी २०१६ ते २०१९ या कालावधीत जोरहाट परिसरातील प्रमुख चहाबागांमधील मातीचे विविध ऋतूंमध्ये परीक्षण केले. या अभ्यासातून स्पष्ट झाले, की तापमानातील बदल, पावसाची अनिश्चितता आणि हवामानातील अस्थिरता यामुळे मातीतील जीवाणू, बुरशी आणि विविध एन्झाइम्सच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे. हे सूक्ष्म जीव मातीतील पोषकद्रव्यांचे चक्र सुरळीत ठेवतात. सेंद्रिय पदार्थांचे विघटन करतात आणि वनस्पतींना आवश्यक पोषण उपलब्ध करून देतात. म्हणजेच हे सूक्ष्म जीव मातीचा प्राणवायूच ठरत आहेत.

कृषी क्षेत्रात आपण जमिनीची सुपीकता, रासायनिक खते, सिंचन, सुधारित बियाणे आणि उत्पादनवाढ याबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा करतो; परंतु मातीतील जैविक जीवनाकडे फारसे लक्ष दिले जात नाही. प्रत्यक्षात जमिनीची खरी सुपीकता तिच्या रासायनिक घटकांपेक्षा जैविक विविधतेवर अधिक अवलंबून असते. मातीतील अब्जावधी सूक्ष्म जीव सतत कार्यरत असतात. ते नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम यांसारख्या पोषक घटकांचे रूपांतर वनस्पतींना उपलब्ध होईल अशा स्वरूपात करतात. एंझाइम्स ही या संपूर्ण प्रक्रियेची ऊर्जा आहेत. हे अदृश्य जगच चहाच्या रोपांचे जीवन टिकवून ठेवते. हवामानबदलामुळे हे संतुलन बिघडू लागले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये ईशान्य भारतात अतिवृष्टी, दीर्घ कोरडे कालखंड, उष्णतेच्या लाटा आणि अनियमित ऋतुचक्र यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या बदलांचा परिणाम केवळ चहाच्या झाडांवर होत नाही, तर त्यांच्या मुळांभोवती असलेल्या सूक्ष्म जीवांच्या जगावरही होतो. तापमानात किंचित वाढ झाली किंवा मातीतील ओलाव्याचे प्रमाण बदलले तरी अनेक लाभदायक सूक्ष्म जीव निष्क्रिय होतात किंवा त्यांची संख्या कमी होते. त्याचा परिणाम मातीच्या आरोग्यावर आणि पुढे उत्पादनावर होतो.

आज हवामानबदल हा केवळ पर्यावरणीय प्रश्न राहिलेला नाही, तर अर्थव्यवस्था, रोजगार आणि अन्नसुरक्षेशी थेट जोडला गेला आहे. भारत हा जगातील सर्वात मोठ्या चहा उत्पादक देशांपैकी एक आहे. आसाम, दार्जिलिंग, दोआर्स, निलगिरी या भागांमधील चहा जागतिक बाजारपेठेत वेगळी ओळख निर्माण करतो. लाखो कामगारांचे जीवन चहाच्या उद्योगावर अवलंबून आहे. चहा निर्यातीमुळे देशाला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळते. त्यामुळे या उद्योगावर येणारे कोणतेही संकट केवळ एका कृषी क्षेत्राचे नुकसान नसून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेलाही धक्का देणारे आहे. दार्जिलिंग चहाच्या उत्पादनात झालेली घट याच संकटाची पूर्वसूचना आहे. काही दशकांपूर्वी चहाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत होते, त्यात सातत्याने घट होत आहे. यामागे तापमानातील वाढ, पावसाचे बदलते स्वरूप आणि कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव ही प्रमुख कारणे असल्याचे अनेक संशोधनांमध्ये स्पष्ट झाले आहे. इतकेच नव्हे, तर चहाचा विशिष्ट सुगंध, स्वाद आणि आरोग्यदायी अँटिऑक्सिडंट गुणधर्म निर्माण करणाऱ्या जैवरासायनिक प्रक्रियांवरही हवामान बदलाचा परिणाम होत असल्याचे संशोधकांनी अधोरेखित केले आहे. याचा अर्थ भविष्यात चहा उपलब्ध राहील; पण त्याचा दर्जा आणि वैशिष्ट्य बदलू शकते. आसाममधील संशोधनाने आणखी एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. मातीतील सूक्ष्मजीव आणि एन्झाइम्स हे हवामानबदलाचे सर्वात संवेदनशील जैविक निर्देशक आहेत. म्हणजेच हवामानातील बदलांचा परिणाम सर्वप्रथम यांच्यावर दिसून येतो. या जैविक संकेतकांचे नियमित निरीक्षण केले, तर भविष्यातील उत्पादनातील संभाव्य घट किंवा जमिनीच्या आरोग्यातील बिघाड याचा अंदाज आधीच घेता येऊ शकतो.

कृषी क्षेत्रात ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. भारतात हरितक्रांतीनंतर रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला. उत्पादन वाढले; परंतु जमिनीची नैसर्गिक सुपीकता हळूहळू कमी होत गेली. अनेक भागांमध्ये सेंद्रिय कार्बनचे प्रमाण घटले, सूक्ष्म जीवांची विविधता कमी झाली आणि जमिनीची पाणी धारण करण्याची क्षमता घटली. हवामानबदलामुळे ही समस्या अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे भविष्यातील शेती ही केवळ रासायनिक खतांवर अवलंबून राहू शकत नाही. मातीतील जैविक जीवन जपणे हीच शाश्वत शेतीची खरी गुरुकिल्ली ठरणार आहे. यासाठी सरकारनेही धोरणात्मक पातळीवर बदल करणे आवश्यक आहे. 'मृदा आरोग्य पत्रिका' या योजनेत प्रामुख्याने रासायनिक घटकांची तपासणी केली जाते. भविष्यात त्यामध्ये मातीतील जैविक घटक, सूक्ष्म जीवांची संख्या, एन्झाइम्सची सक्रियता आणि सेंद्रिय कार्बन यांचाही समावेश करण्याची वेळ आली आहे. मातीची खरी गुणवत्ता केवळ पीएच किंवा नत्राच्या प्रमाणावर ठरत नाही, तर तिच्यातील जिवंत जैविक प्रणालीवर ठरते. चहा उत्पादक शेतकऱ्यांनीही बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे गरजेचे आहे. सेंद्रिय खतांचा वापर वाढवणे, हिरवळीच्या खतांचा अवलंब करणे, मल्चिंग, पावसाचे पाणी साठवणे, झाडांचे आच्छादन राखणे आणि रासायनिक खतांचा संतुलित वापर करणे यांसारख्या उपाययोजनांमुळे मातीतील सूक्ष्मजीवांचे संरक्षण करता येईल. हवामानबदल पूर्णपणे रोखणे शेतकऱ्याच्या हातात नसले, तरी जमिनीची जैविक क्षमता टिकवून ठेवणे नक्कीच शक्य आहे.

संशोधन संस्थांनीही प्रयोगशाळेपुरते मर्यादित न राहता या निष्कर्षांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. प्रत्येक चहाबागेचा जैविक आरोग्य नकाशा तयार करणे, हवामानानुसार सूक्ष्मजीवांच्या बदलांचे निरीक्षण करणे आणि त्यानुसार पोषण व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करणे ही काळाची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, रिमोट सेन्सिंग आणि जैवतंत्रज्ञान यांचा वापर करून भविष्यात मातीच्या आरोग्याचे अचूक अंदाज वर्तवणेही शक्य होईल. जलवायु परिवर्तनाच्या चर्चेत कार्बन उत्सर्जन, अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने किंवा औद्योगिक प्रदूषण यांना प्राधान्य दिले जाते; मात्र मातीतील जैवविविधता हा विषय अजूनही चर्चेच्या केंद्रस्थानी आलेला नाही. पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाचे अस्तित्व मातीवर अवलंबून आहे आणि मातीचे अस्तित्व त्या अदृश्य सूक्ष्म जीवांवर अवलंबून आहे. म्हणूनच हवामानबदलाविरुद्धची लढाई मातीपासून सुरू झाली पाहिजे. भारताला पुढील काही दशकांमध्ये हवामानबदलाचे सर्वाधिक परिणाम भोगावे लागतील, असा इशारा विविध जागतिक अहवालांनी दिला आहे. अशा परिस्थितीत कृषी क्षेत्राला अधिक सक्षम, शाश्वत आणि पर्यावरणपूरक बनवणे ही राष्ट्रीय गरज आहे. चहा उद्योगात सुरू झालेले संशोधन इतर पिकांसाठीही दिशादर्शक ठरू शकते. ऊस, कॉफी, मसाले, भात आणि फळबागांमध्येही मातीतील जैविक संकेतकांचा अभ्यास वाढवण्याची आवश्यकता आहे.

आज प्रत्येक भारतीयाच्या हातातील चहाचा कप हा केवळ पेयाचा नाही, तर निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्याचे प्रतीक आहे. त्या कपमधील सुगंध टिकवायचा असेल तर चहाच्या मळ्यांमधील मातीचा श्वास जिवंत ठेवावा लागेल. हवामानबदलाचा मुकाबला केवळ घोषणांनी होणार नाही. त्यासाठी विज्ञानाधारित शेती, मातीचे जैविक संवर्धन, शाश्वत कृषी पद्धती आणि पर्यावरणपूरक धोरणांची सांगड घालावी लागेल.

। चर्चा आजची

# मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवणं योग्यच

आजकाल मोबाईल मुलांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाल्याचे दिसून येत आहे. बहुतेक मुले तासन्‌तास मोबाईलमध्ये व्यस्त असतात. मोबाईल मिळाला नाही तर ती बचैन होतात. आज प्रत्येक घरात डोकावून पाहिलं तर घरातील मुलं पुस्तकांमध्ये कमी मोबाईलमध्येच जास्त दंग झालेली दिसून येतात. वाढत्या वयात मुलांनी वेगवेगळी पुस्तक वाचून नवनवीन काहीतरी शिकणे, मैदानावर खेळ खेळणे, मोकळ्या हवेत बाहेर फिरणे, पालकांबरोबर संभाषण करणे फार जास्त गरजेचे आहे. मात्र आता परिस्थितीच बदललेली दिसून येते. सोशल मीडियावर जास्तीत जास्त वेळ घालविणाऱ्या मुलांना या महत्वाच्या गोष्टींची विशेष गरज भासत नाही.

आजच्या काळात मोबाईलचा वापर सर्वत्र सामान्य झाला आहे. सद्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत सारेच सोशल मीडियावर सक्रिय दिसतो. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी प्रत्येकाला अपडेट राहणं गरजेचं आहे. परंतु, त्याच्या आहारी जाणे हेही तितकेच धोक्याचे ठरू शकतं हे नाकारता येत नाही. आजकाल प्रत्येक व्यक्तीचे सोशल मीडियावर खाते आहे. सगळेच फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स यासारखी समाजमाध्यमे वापरतात. परंतु १८ वर्षाखालील मुलेदेखील सोशल मीडियाचा सर्रास वापर करत असल्याचे दिसून येते. यामुळे मुलांची फसवणूक, लैंगिक शोषण, आर्थिक लूट यासारखे प्रकार सतत घडत असल्याचे दिसून येत आहेत. त्यामुळे निदान १८ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर काही निर्बंध आणणे गरजेचे झाले आहे.

**अंतरा पारंगे**

घरातील, अजूबाजूची माणसं यांना बघूनच मुलं मोठी होत असतात. जर सगळ्यांच्या हाती कायम चिकटलेला मोबाईल आणि सोशल मीडियावर कायम त्यांना सक्रिय असल्याचे बघत ते मोठे होत असतील तर मुलांनी त्याचे अनुकरण केल्यास यात नवल काहीच नाही. बऱ्याचदा पालक आपल्या लहान मुलांचे मजेदार व्हिडीओ बनवून सोशल मीडियावर टाकतात. यामुळे मग मुलांनाही या सोशल मीडियाची चटक लागते. या सोशल मीडियाच्या युगात विशेषतः इंस्टाग्रामच्या वारंवार वापरामुळे लहान आणि तरुणांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे.



बऱ्याचदा पालक कामानिमित्त घराबाहेर असतात आणि त्यांची मुलं घरात असतात. अशावेळी एकमेकांच्या संपर्कात राहण्याच्या उद्देशासाठी मुलांकडे मोबाईल देणे गरजेचे आहे. परंतु, जेव्हा त्या मोबाईलमध्ये व्हॉट्सअॅप, फेसबुक, यूट्यूब, इंस्टाग्राम, आणि विविध गेम्स यांनी भरला जातो, तेव्हा आपण मुलांच्या हाती नेमकं काय देतोय, याचा प्रत्येक पालकाने विचार करणे खूप गरजेचे आहे. सोशल मीडिया हा सोशल गोष्टींसाठी असावा, वैयक्तिक नाही, याचे भान वयाने, अनुभवाने परिपक्व माणसांना देखील नसते तर मुलांना ते कुठून असणार? मुलांना बिझी ठेवण्यासाठी आणि पालकांना आपला स्वत:चा वेळ मिळण्यासाठी मुलांच्या हाती मोबाईल देणे ही उत्तम सोय असते. मुलांनी चिडचिड किंवा मस्ती करण्यापेक्षा हा घे मोबाईल आणि काय हवं ते बघ बोलणं पालकांना हे जास्त सोपं पडत आणि हा प्रकार प्रवासात, दवाखान्यात किंवा एखाद्या कार्यक्रम सर्रास पाहावयास मिळतो.

खर तर मुलांना मोबाईलची सवय ही पालकांकडूनच लागते. मुलांना लहानपणी एक घास चिऊचा, एक घास काऊचा असे सांगत आणि त्यांच्या मागे मागे फिरत घास भरवला जायचा. मात्र आता यासाठी द्यावा लागणारा वेळ अथवा धीर पालकांकडे नसतो. मग काय मुलाच्या हाती मोबाईल देऊन काम सोपे केले जाते. मग त्या छोट्याशा स्क्रीनवर रंगीबेरंगी आणि भरधाव बदलणारी चित्रे पाहून लहान मुलं त्यातच हरवून जातात. आणि हीच सवय कायम राहते. मुलांना उठता बसता, खाताना सतत मोबाईल हवा असतो. सोशल मीडियाच्या माध्यमातूनच काही गोष्टी वयाच्या आधीच त्यांच्यापर्यंत पोहोचतात. तर कधी कधी आभासी दुनियेने मांडलेल्या गोष्टी त्यांना खऱ्या वाटू लागतात. मग मुलं त्याप्रमाणे वागायला बघतात. आणि यातून बऱ्याचदा मुलं गुन्हेगारी प्रवृत्तीला बळी पडतात. ऑनलाइन गेम ही गोष्ट मुलांना विशेष भुलवणारी आहे. मात्र हे ऑनलाईन गेम हे सायबर क्राइमसाठी उत्तम साधन बनत आहे.

ऑनलाइन गेम्सच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक तर होतेच; पण आपले अकाऊंट टेक ओवर करून आपली ओळख वापरुन अनेक गुन्ह्यांत अडकवले जात असल्याचे प्रकार घडत असल्याचे पाहायला मिळत आहेत. सायबर क्राइमसाठी सोशल मीडियावरील मुले सॉफ्ट टार्गेट आहेत आणि शिवाय यामुळे त्यांच्यात अगदी लहान वयातच नैराश्य, बेचैनी, नकरात्मकता, धीर धरण्याचा अभाव, व्यसनाधीनता वाढू लागल्याचे दिसून येत आहे. याचीच जाणीव झाल्यावर आता सोशल मीडिया वापरण्यासाठी वयाची अट असण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

। लोकसंसद

## सर्वसामान्यांच्या खिशाला 'लिंबा'च्या दरवाढीचे चटके

मुंबईच्या वाशीसारख्या घाऊक बाजारांतून किरकोळ विक्रेत्यांपर्यंत पोहोचेपर्यंत लिंबू कमालीचे महागले असून काही दिवसांपूर्वी ३ ते ५ रुपयांना मिळणाऱ्या एका लिंबाची किंमत सध्या चक्क १० ते १५ रुपयांवर जाऊन पोहोचली आहे. अशा परिस्थितीत आधी साखर महागली, कांदा महागला आणि आता लिंबूही महाग झाल्यामुळे एक लिंबूसुद्धा खरेदी करताना सर्वसामान्यांना आता विचार करावा लागत आहे. लिंबू हा केवळ जेवणाची चव वाढवणारा एक घटक नसून अनेकांच्या रोजच्या आहारात लिंबाचा वापर होतो. विशेष म्हणजे लिंबू हा सर्वसामान्यांसाठी 'क' जीवनसत्वाचा सर्वात स्वस्त आणि मुख्य नैसर्गिक स्रोत आहे. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आणि निरोगी आरोग्यासाठी 'क' जीवनसत्वाची रोज गरज असते. मात्र अत्यंत आरोग्यदायी असणारे लिंबू अचानक एवढे महाग झाल्यामुळे लिंबू सरबत आणि हॉटेलमधील जेवणातूनही आता दुर्मिळ झाले आहे. देशात सर्वाधिक लिंबू उत्पादन करणाऱ्या आंध्र प्रदेश आणि गुजरात या राज्यांसह महाराष्ट्रातील प्रमुख लिंबू उत्पादक असलेल्या सोलापूर, अहिल्यानगर, जळगाव आणि अकोला या भागांमध्ये यंदा अपुऱ्या पावसामुळे लिंबाच्या बागांमधील उत्पादनावर कमालीचा विपरीत परिणाम झाला. त्यामुळे लिंबाची घाऊक बाजारातील आवक मोठ्या प्रमाणात घटली. परिणामी लिंबाच्या दरात मोठी वाढ झाल्याचे कारण सांगण्यात येते. लिंबू दरवाढीची कारणे काहीही असोत, मात्र आधीच महागाईने पिचलेल्या सर्वसामान्यांच्या खिशाला आता 'लिंबा'च्या दरवाढीचे चटके बसू लागले आहेत.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

। दिनविशेष

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले. त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि. स. खांडेकर यांची सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढली. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली. इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी



मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले, अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की, लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली, त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# गणेशोत्सवानंतरही खड्डे कायम



■ पनवेल-नवीन पनवेल-पोदी मार्गाची दुरवस्था

■ वाहनचालक त्रस्त

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

पनवेलहून नवीन पनवेलमार्गे पोदीकडे जाणाऱ्या रस्त्याची दिवसेंदिवस दुरवस्था होत असून, ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त झाले आहेत. खड्ड्यांतून मार्ग काढताना दुचाकीस्वारांची मोठी कसरत होत आहे. वाहनांचे नुकसान होण्याबरोबरच प्रवाशांना सततच्या धक्क्यांचा त्रास सहन करावा लागत आहे.

गणेशोत्सवाच्या काळात रस्त्यावरील खड्डे बुजवले जातील, अशी अपेक्षा वाहनचालकांना होती. मात्र, 'गणपती बाप्पा गेले गावाला, खड्डे मात्र तेथेच राहिले', अशी उपरोधिक प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दररोज या खड्ड्यांतून प्रवास केल्याने मणक्याच्या दुखण्याचा त्रास वाढत असल्याच्या तक्रारीही वाहनचालकांनी केल्या आहेत.

विशेष म्हणजे, १ ऑक्टोबर रोजी पनवेल महानगरपालिकेचा वर्धापन दिन साजरा होत आहे. पालिकेच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर शहराच्या विकासाची चर्चा रंगत असताना, दुसरीकडे नागरिकांना मात्र खड्डेमय रस्त्यांवरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे या मार्गाची केवळ तात्पुरती डागडुजी न करता कायमस्वरूपी आणि दर्जेदार रस्ता कधी होणार, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

या मार्गावरून दररोज नागरिक, विद्यार्थी, कामगार आणि वाहनचालकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही आणि अपघाताचा धोका अधिकच वाढतो. त्यामुळे पालिका प्रशासनाने तातडीने या रस्त्याची पाहणी करून खड्डे बुजवावेत, तसेच नवीन रस्त्याचे काम हाती घ्यावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

## यंदा तरी नवीन रस्ता मिळणार का?

पनवेल महानगरपालिकेचा वर्धापन दिन साजरा होत असताना, नागरिकांना केवळ भाषणांपेक्षा मूलभूत सुविधांची अपेक्षा आहे. त्यामुळे 'यंदा तरी नवीन रस्ता पाहायला मिळणार आहे का?' असा सवाल वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे.

# सहा महिन्यांतच फुटपाथची दुरवस्था



| खांदेश्वर | प्रतिनिधी|

सायन-पनवेल महामार्गावरील ठाणा नाका परिसरात पनवेल महानगरपालिकेने काही महिन्यांपूर्वी केलेल्या फूटपाथच्या कामाची अल्पावधीतच दुरवस्था झाल्याचे चित्र दिसून येत आहे. काम पूर्ण होऊन अद्याप सहा महिनेही उलटले नसताना फूटपाथची फरशी व इतर भाग खराब झाल्याने या कामाच्या दर्जाबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

ठाणा नाका परिसरात दररोज मोठ्या संख्येने नागरिकांची ये-जा असते. मात्र फूटपाथ खराब झाल्याने नागरिकांना तुटलेल्या व उखडलेल्या भागातून मार्ग काढावा लागत आहे.

नुकतेच करण्यात आलेले काम इतक्या कमी कालावधीत खराब होत असेल, तर कामाची गुणवत्ता तपासण्यात आली होती का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. महापालिकेने संबंधित कामाची पाहणी करून दोष आढळल्यास ठेकेदारामार्फत तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१ ऑक्टोबर

१) श्री.शामराव बारक्या ठाकूर हाशिवरे अलिबाग दि.१-१०-१९३५
२)श्रीम.पूर्णिमा भालचंद्र चव्हाण अलिबाग दि.१-१०-१९४९
३)श्रीम.प्रतिभा कुमार टोळ ब्राम्हणआळी, अलिबाग दि.१-१०-१९४५
४)श्रीम.सुनिता सुरेश तारे अलिबाग, दि.१-१०-१९५२
५)श्री.अविनाश भगवान सुतार रामनाथ रोड, अलिबाग दि.१-१०-१९५६
६)श्रीम.विद्या पद्माकर कुवळेकर ब्राम्हणआळी, अलिबाग दि.१-१०-१९५९

# मुख्याध्यापक संघटनेची वार्षिक सभा



**अलिबाग** : रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सेवानिवृत्त मुख्याध्यापक संघटनेची पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा पेझारी येथील संघटनेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत पाटील यांच्या निवासस्थानी पार पडली. सभेस जिल्हयातील अलिबाग, पेण, पनवेल, पाली-सुधागड, कर्जत, मुरुड, रोहा, महाड व पुणे येथून मुख्याध्यापक उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी अध्यक्ष श्रीकांत पिटील यांनी सर्व उपस्थित मुख्याध्यापकांचे स्वागत केले. सभेच्या सुरुवातीला दिवंगत मुख्याध्यापिका भारती हळदवणेकर यांना व अन्य ज्ञात-अज्ञातांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर संघटना सचिव अजय पाटील यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. सभेतील चर्चेत कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, सल्लागार तसेच इतरांनी सहभाग नोंदविला. त्यानंतर संघटनेचे खजिनदार पी.के. पाटील यांनी संस्थेचा जमाखर्च वाचून दाखविला, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. यावेळी संघटनेची नोंदणी व ऑडिटबद्दल सखोल चर्चा झाली. यावेळी महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त मुख्याध्यापक संघटनेचे नियोजित पंढरपूर येथील ३० व ३१ ऑक्टोबर रोजीचे राज्यस्तरीय अधिवेशन अथवा स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी रायगडातून मोठया संख्येने सेवानिवृत्त मुख्याध्यापकांनी उपस्थिती लावावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# सिद्धिविनायक मंदिरात भाविकांची गर्दी

| खांदेश्वर | प्रतिनिधी|

पनवेलच्या भारत नाका कापड बाजार परिसरातील ज्येष्ठराज सिद्धिविनायक गणेश मंदिरात मंगळवारी (दि.२९) अंगारकी चतुर्थीनिमित्त भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. अंगारकी चतुर्थीच्या निमित्ताने पहाटेपासूनच मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी करण्यास सुरुवात केली. श्री सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी महिला, पुरुष तसेच ज्येष्ठराज नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाली येथील विद्यार्थ्यांनी कौशल्यानुसार क्षेत्र निवडावे

वैकुंठ पाटील यांचे आवाहन



| पाली/बेणसे | प्रतिनिधी | |

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या वतीने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग आणि शेठ जे. एन. पालीवाला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार महाकुंभ'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषद व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांनी विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध संधींची माहिती घेऊन आपल्या कौशल्यानुसार क्षेत्र निवडण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला सुधागड एज्युकेशन सोसायटीचे सचिव ग.रा. म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत वारगुडा, संचालक आलाप मेहता, डॉ. लहुपचंग व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना वैकुंठ पाटील म्हणाले की, कॉमर्स शाखेतील विद्यार्थ्यांसाठी कंपनी प्रशासन, मॅनेजमेंटसह विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी यांसारख्या काही ठरावीक क्षेत्रांचीच माहिती विद्यार्थ्यांना असते. मात्र कॉमर्समध्येही अनेक मोठे विभाग असून त्यामध्ये करिअरच्या विविध संधी आहेत. आर्ट्स शाखेच्या विद्यार्थ्यांनाही विविध क्षेत्रांत चांगले काम करण्याची संधी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक शाखेनुसार उपलब्ध असलेल्या रोजगार व करिअरच्या संधींची योग्य माहिती देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

या रोजगार महाकुंभात मेगा पाईप्स प्रा. लि., केवा फ्लॉवर्स प्रा. लि., सिलिकॉन इंटरनॅशनल प्रॉडक्ट्स, अदानी एनर्जी सोल्युशन्स लि., एस. टी. अँथोनी ऑटो, गार्गी हट्टनेस अल्बर्टर्स प्रा. लि., गोदरेज एंटरप्रायझेस ग्रुप, सनशील्ड केमिकल लि. आदी कंपन्यांनी सहभाग घेतला.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते



**विश्वनाथ (विलास) निगळ्ये, ठाणे**

**कै. परशुराम मोरेश्वर घरत, स्मरणार्थ कवळे आळी, थळ, अलिबाग**

**पान १ वरुन**

## दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ

महाराष्ट्रातील तब्बल २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या भागांत विशेष बाब म्हणून विविध उपाययोजना आणि सवलती लागू करण्यात आल्या आहेत. या सवलतींचाच एक भाग म्हणून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.या निर्णयामुळे आधी शुल्क भरा व नंतर पैसे परत घ्या, हा प्रकार बंद होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाने दिलेल्या सूचनेनुसार, फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे ऑनलाइन आवेदनपत्रे भरताना पुढील आदेश येईपर्यंत कोणतेही परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागीय मंडळांनी आपापल्या क्षेत्रातील दुष्काळग्रस्त तालुक्यांतील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना तातडीने सूचना देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळाकडे त्वरित सादर करण्यास सांगण्यात आले आहे. शासनाच्या या निर्णयामुळे हजारो विद्यार्थ्यांना आणि पालकांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. राज्य मंडळाकडून याबाबतच्या सविस्तर आणि अतिरिक्त मार्गदर्शक सूचना लवकरच स्वतंत्रपणे निर्गमित केल्या जातील, असेही मंडळाने स्पष्ट केले आहे.राज्यात दहावी, बारावीचे ३२ लाख विद्यार्थी आहेत. त्यांच्याकडून आधी पैसे घेणे व नंतर परत करणे, ही बाब मनस्ताप देणारी ठरू शकते. म्हणून आताच परीक्षा शुल्क घेऊ नये, ही भूमिका गांभीर्याने घेण्यात आली. शिक्षक संघटनाही त्यासाठी आग्रही होत्या. शुल्क भरण्याची प्रक्रिया सुरू असल्यामुळे आताच हा निर्णय घेण्यात आला. यामुळे प्रतिपूर्ती हा प्रकार राहणार नाही, असे मंडळ अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

## सागरी सुरक्षेसाठी पोलीस अलर्ट मोडवर

वाजल्यापासून रस्त्यावर खाडी, सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंदरांसह समुद्रकिनाऱ्यांवर पोलिसांनी नाकाबंदी सुरु केली आली आहे. येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणीस किनाऱ्यावरील संशयीत हालचालीवर लक्ष ठेवले जात आहे. यासाठी होमगार्ड जवानची मदत ही घेण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली सागरी कवच अभियान जिल्ह्यात राबविण्यात आले आहे. सागरी सुरक्षा अधिक बळकट ठेवण्यासाठी तसेच सागरी व खाडी किनारी होणाऱ्या संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी रायगड पोलिसांच्या वतीने सागरी कवच अभियान सुरु केले आहे. या अभियानासाठी जिल्ह्यातील १५ हून अधिक खाडी व सागरी पोलीस ठाण्यासह इतर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाक्या नाक्यावर बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलिसांसह एकूण एक हजार सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. ८०पोलीस अधिकारी, ६५० पोलीस अंमलदार, ७६ होमगार्ड, २०४ सागरी सुरक्षा दलाचा समावेश आहे.

सागरी कवच अभियान ३६ तासांचे आहे. सागरी सुरक्षा अधिक बळकट करण्याबरोबरच सागरी किनारी होणाऱ्या संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी हे अभियान सुरु करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, वरसोली, काशीद, मांडवा, आवास, रेवस, किहीम, रेवदंडा, नागाव, आक्षी, मुरूड, दिवेआगार, आगरदांडा, दिघी, श्रीवर्धन, म्हसळा अशा अनेक समुद्रकिनारी तसेच जिल्ह्यातील वेगवेगळ्या बंदरावरील सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी हे अभियान राबविण्यात आले. रस्त्यावर खाडी, सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंदरांसह समुद्रकिनाऱ्यांवर पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला आहे.या अभियानाद्वारे रस्त्यांवरील वाहनांची तपासणी केली जात असून समुद्रकिनारी आधुनिक साधनसामुग्रीचा आधार घेत समुद्रातील संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जात आहे. गुरुवारी सायंकाळी सहा वाजता या अभियानाचा समारोप होणार असल्याची माहिती रायगड पोलिसांकडून देण्यात आली. रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत असताना जिल्ह्यात वेगवेगळे प्रकल्प आहेत. मागील काही वर्षापूर्वी जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडीमध्ये शस्त्रसाठा सापडला होता. त्यानंतर रेवदंडयासह जिल्ह्यातील अनेक समुद्रकिनारी अंमली पदार्थाचा साठा सापडला होता. रेवदंड्यामध्ये समुद्र किनारी एक आधुनिक यंत्र ही दिसून आले होते. जिल्ह्यातील सागरी सुरक्षा मजबूत ठेवण्यासाठी रायगड पोलिसांमार्फत हे अभियान राबविण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## भारतीय लेकींची सुवर्णझळाळी

आपली लय पकडली. सुमारे २०० मीटरचा टप्पा गाठल्यानंतर तिने वेग वाढवला. बहरीनची सलवा ईद नासेर भारताचे अंतर कमी करण्यासाठी प्रयत्न करत होती. मात्र विथ्याने मिळवलेली आघाडी कायम ठेवत अंतिम रेषा सर्वप्रथम ओलांडली.

नागोया आशियाई क्रीडा स्पर्धेतील विथ्या रामराजचे हे दुसरे पदक ठरले. यापूर्वी तिने ४०० मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदक पटकावले होते. आता ४४०० मीटर रिलेमध्ये सुवर्णपदक जिंकत विथ्याने आपल्या पदकात आणखी एका मोठ्या कामगिरीची भर घातली. क्रिकेट, कबड्डी आणि नेमबाजीतील सुवर्णपदकांनंतर आता ॲथलेटिक्समध्येही भारताने सुवर्णवेध घेतला आहे. भारतीय महिला धावपटूंच्या या कामगिरीमुळे देशाच्या पदकतालिकेत आणखी एका सुवर्णाची भर पडली आहे. किरण, पूवम्मा, प्राची आणि विथ्याया चौघींच्या वेगवान पावलांनी आशियाडच्या ट्रॅकवर भारताचा तिरंगा पुन्हा एकदा दिमाखात फडकला.

## नेरळमधील उपोषणकर्त्याची प्रकृती ढासळली

त्यांची बायपास झाली असून त्यांनी उपोषण काळात दररोज घेण्याच्या गोळ्यांचे सेवन करणे बंद केले आहे. त्याचा त्रास मध्यरात्री जाणवू लागला आणि त्यांना चक्कर येऊ लागली. त्यावेळी बंदोबस्तात असलेले पोलिसांनी याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातून वैद्यकीय पथक पोहचले. परंतु बीपी खाली येत असल्याने कळंब येथून डॉक्टर बोलावून घेण्यात आले. कळंब येथून वैद्यकीय अधिकारी डॉ. केवारी तेथे पोहचले आणि त्यानंतर वैद्यकीय तपासण्या झाल्या. यावेळी डॉ. केवारी यांनी सर्व गोळ्या वेळेवर घेण्याचा सल्ला दिला असून याप्रसंगी नेरळ गावातील शेकडो तरुण उपोषणस्थळी उपस्थित होते.मध्यरात्रीनंतर उपोषणकर्ते गोरख शेप यांना संपूर्ण बेड रेस्ट घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्यांच्याकडून विश्रांती घेतली जात आहे किंवा नाही यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गुरुवारी सकाळपर्यंत उपोषणकर्त्याने पूर्ण विश्रांती घेतली आहे. उपोषणाचा तिसरा दिवस असून गटविकास अधिकारी, तहसीलदार, बांधकाम खात्याचे उप अभियंता, प्राधिकरणाचे तांत्रिक अधिकारी यांच्याकडून उपोषणकर्त्यांचा मागणीवर सकारात्मक निर्णय घेतले जातात किंवा नाही याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

## निवडणूक आयोगाविरोधात इंडिया आघाडी आक्रमक

मोर्चा काढणार आहोत, अशी घोषणा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली आहे.

**सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने**

इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं की, इंडिया आघाडीच्यावतीने २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत देशभरातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने करण्यात येतील. २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान आम्ही जिल्हास्तरावर लोकशाही वाचवा पदयात्रा काढणार आहोत. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर निदर्शने करणार आहोत. आम्ही ही मोहीम का राबवत आहोत याबद्दलही जनतेत जनजागृती करणार आहोत, अशी माहिती खरगे यांनी सांगितली.

**६ ऑक्टोबरला निवडणूक आयोगावर मोर्चा**

आम्हाला आजच निवडणूक आयोगावर मोर्चा काढायचा होता. मात्र, सर्व खासदारांना पुन्हा बोलावून हे आंदोलन योग्य प्रकारे करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यामुळे आता या मोर्चासाठी ६ ऑक्टोबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. राज्यसभेचे आणि लोकसभेचे सर्व सदस्य, मग ते कोणत्याही पक्षाचे असो आणि ज्यांना देशातील लोकशाहीचं रक्षण करायचं आहे अशा सर्वांना या मोर्चात सहभागी होण्याचं निमंत्रण आम्ही देणार आहोत. ६ ऑक्टोबर रोजी विरोधी पक्षांचे सर्व खासदार निवडणूक आयोगावर मोर्चा काढतील, अशी माहिती मल्लिकार्जुन खरगे यांनी दिली आहे.

**विरोधी पक्षाचे नेते राष्ट्रपतींची भेट घेणार**

सर्वात महत्वाचं म्हणजे या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आम्ही विरोधी पक्षांचे नेते ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात राष्ट्रपतींची भेट घेणार आहोत. आम्हाला भेडसावणाऱ्या समस्या आणि घटनात्मक अडथळ्यांबाबत आम्ही राष्ट्रपतींना निवेदन देणार आहोत. विविध संस्था कशा प्रकारे ताब्यात घेतल्या जात आहेत, याबाबत राष्ट्रपतींना अवगत करणार असून सर्व विरोधी पक्षाचे नेते ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात राष्ट्रपतींची भेट घेणार आहोत, अशी माहिती मल्लिकार्जुन खरगे यांनी दिली. चौथ्या टप्प्यात पाच मोठ्या सभांचा समावेश असेल. त्यांच्या तारखा आणि ठिकाणे निश्चित करून सर्वांना नंतर कळवणार आहोत, असं मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं आहे.

**नोव्हेंबरला दिल्लीत मोर्चा**

इंडिया आघाडीच्या महत्त्वाच्या बैठकीत निवडणूक आयोगाविरोधात देशभरात वेगवेगळ्या टप्प्यात आंदोलन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच पुढील एका महिन्यात देशभरातील पाच मोठ्या शहरात मोर्चे काढून १ नोव्हेंबरला दिल्लीत भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहितीही विरोधकांनी सांगितली आहे.

## माणगावसाठी १८३ कोटी मंजूर, योजना नामंजूर!

१ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. तरीही कचरा संकलनाबाबत तक्रारी कायम असल्याने शहराला दीर्घकालीन आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाची गरज अधोरेखित होत आहे. या दोन्ही योजना मंजूर झाल्या असत्या तर माणगाव शहरातील सांडपाणी आणि घनकचऱ्याच्या समस्येला कायमस्वरूपी दिशा मिळाली असती, अशी चर्चा शहरात सुरू आहे. अलिबाग आणि रोहा येथे अशा योजना सुरू झाल्या असताना माणगाव मात्र पुन्हा एकदा मूलभूत नागरी सुविधांच्या प्रश्नावर मागे पडल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. शहराचा विकास केवळ रस्ते, इमारती आणि सुशोभीकरणापुरता मर्यादित नसतो; नागरिकांना स्वच्छ पाणी, स्वच्छ परिसर, सांडपाण्याची शास्त्रोक्त विल्हेवाट आणि कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन मिळणे हीदेखील विकासाचीच खरी कसोटी आहे. त्यामुळे १८३ कोटी रुपयांच्या या योजनांबाबत झालेला निर्णय आणि त्यामागील कारणांची शहरवासीयांमध्ये आता चर्चा सुरू झाली आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र/करारनामा देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/करारनामा संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जि.रायगड | | | | | | | | |
| १ | करंजाडे २९ | करंजाडे १४०अ | २२अ/१ब/२ | ०-२९-० | ४०० चौ.मी. | मौजे करंजाडे, सेक्टर ६, भूखंड क्र. A१२०/A+ A१२०/B, क्षेत्र ३९९.६० चौ.मी. | **कै. गोविंद वालजी जेठवा उर्फ कुंभार (मयत) (मृत्यू दि. १२/१०/१९९७) कै. देवीदास गोविंद जेठवा उर्फ कुंभार (मयत) (मृत्यू दि. २३/८/२००९) व कै. रामीबाई वालजी जेठवा (मयत) (मृत्यू दि. १५/४/१९६२) यांचे वारस**<br>१. श्री लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास गोविंदजी जेठवा उर्फ कुंभार<br>२. श्री चंद्रकांत गोविंदजी जेठवा उर्फ कुंभार<br>३. श्री विजय गोविंदजी जेठवा उर्फ कुंभार<br>४. श्री प्रकाश गोविंदजी जेठवा उर्फ कुंभार<br>५. श्रीमती नर्मदा जयकिशन देवलीया<br>६. श्रीमती कांताबेन आनंदजी चित्रोड उर्फ प्रजापती<br>७. श्रीमती पद्मा उर्फ पन्ना सुरेश सोरथीया<br>८. श्रीमती धर्मीष्ठा देवीदास जेठवा उर्फ कुंभार<br>९. श्री अतुल देवीदास जेठवा उर्फ कुंभार<br>१०. श्री बिना कूंदन देवलिया<br>११. श्री जिग्नेश देवीदास जेठवा उर्फ कुंभार हे आहेत.<br>वारसदाखला क्र CMA No.२४०/२०१३<br>**कै. नर्मदा जयकिशन उर्फ जेठालाल देवालिया मयत (मृत्यू दि. २०/०७/२०२०) यांचे वारस**<br>१. श्री. प्रदीप जयकिशन उर्फ जेठालाल देवालिया<br>वारसदाखला क्र CMA No.४९८/२०२०<br>**कै. लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास गोविंद जेठवा उर्फ कुंभार मयत (मृत्यू दि. ३०/०८/२०१५) यांचे वारस**<br>१. श्रीमती. भानुमती लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास जेठवा उर्फ कुंभार<br>२. श्री. योगेश लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास जेठवा उर्फ कुंभार<br>३. श्रीमती. रिना लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास जेठवा उर्फ कुंभार उर्फ रिना सुधीर चावडा<br>वारसदाखला क्र CMA No.४६७/२०१६ | |
| | | करंजाडे १४०ब | २२अ१/ब/२<br>२२अ/३ | ०-१३-२<br>०-०४-० | | | | |
| | | एकुण संपादित क्षेत्र | | ०-४६-२ | | | | |
| २ | रोडपाली ८० | ७६ | १३७/० | ०-२८-३ | २५० चौ.मी. | भूखंड क्र. १४ ब, सेक्टर ८ई, क्षेत्र २५० चौ.मी. कळंबोली नोड | **कै. चंपुबाई दत्तात्रेय गुजराथी (मयत) व इतर यांचे वारस-**<br>**१. श्री दिनेश रमाकांत गुजराथी व**<br>**२. श्री. नवनित जयवंत गुजराथी** | निरंक |
| ३ | नवघर - ९३२ | ३५६/ ८५-८६ | ३१८/१अ<br>३२०/७<br>३२९/३<br>३३५/१<br>३३९/४<br>३५१/८<br>३४९/५ब | ०-१७-२<br>०-१४-८<br>०-२४-८<br>०-१०-०<br>०-०७-०<br>०-१६-०<br>०-०२-३ | ४०० चौ.मी. | मौजे द्रोणागिरी येथील भुखंड क्र. १६७, सेक्टर-६५, क्षेत्र ४०० चौ.मी. | **कै. मोतीराम शिवा पाटील (मयत) यांचे वारस**<br>१. श्री. सदानंद मोतीराम पाटील<br>२. श्री. धनाजी उर्फ धनंजय मोतीराम पाटील<br>३. श्रीमती. लताबाई हरीभाऊ पंडीत<br>४. श्रीमती. मंदाबाई परशुराम मढवी<br>५. श्रीमती. बामीबाई हरेश्वर भगत | उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर येथील RCS १३/२००९ दाव्यानुसार १) धनाजी उर्फ धनंजय मोतीराम पाटील यांना ४०० चौमी. २)सदानंद मोतीराम पाटील व इतर ३ यांना ४०० चौ.मी. हिस्साचे वाटप करण्याचे आदेश दिले. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह बाब निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, सिडको भवन, तळ मजला, भूमि विभाग १२.५०%, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण/पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२४०/२०२६-२७

# किडे अन् विष्ठा, पोषणाची दुर्दशा!

## रायगडच्या अंगणवाडीतील तक्रारीची केंद्राने घेतली दखल; महाराष्ट्र शासनाला सखोल चौकशीचे निर्देश

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

राष्ट्रीय पोषण माह सुरू असतानाच रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांमधील पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. कर्जत तालुक्यातील वरची भागूची वाडी येथील अंगणवाडीमध्ये बालके, गर्भवती व स्तनदा मातांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारात किड लागलेली डाळ, उंदरांच्या विष्ठेने दूषित झाल्याचा आरोप असलेली साखर तसेच सडलेली फळे आढळल्याची तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीची केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाने दखल घेत महाराष्ट्र शासनाला सखोल चौकशीचे निर्देश दिले आहेत. अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाकडे यासंदर्भात तक्रार केली होती. त्यांच्या म्हणण्यानुसार, रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये पोषण आहाराच्या पुरवठ्याबाबत गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### केंद्राकडून राज्याला चौकशीचे निर्देश

संजय सावंत यांनी ९ सप्टेंबर २०२६ रोजी पोर्टलवर तक्रार दाखल केली होती. त्यानंतर केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाच्या अवर सचिव नूतन कुमारी यांनी २१ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या सचिवांना पत्र पाठवून तक्रारीची दखल घेतल्याचे नमूद करण्यात आले आहे. सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने तिच्या अंमलबजावणीची जबाबदारी राज्य शासनावर असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले असून, तक्रारीची सखोल चौकशी करून नियमांनुसार आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच करण्यात आलेल्या कारवाईचा अहवाल तक्रारदारासह केंद्र सरकारला सादर करण्याचे निर्देश असल्याचे तक्रारदाराकडून सांगण्यात आले आहे.

### वरची भागूची वाडी प्रकरण चर्चेत

कर्जत तालुक्यातील वरची भागूची वाडी येथील अंगणवाडी केंद्रात पुरविण्यात आलेल्या धान्याची गुणवत्ता संशयास्पद असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. डाळीत किडे आढळणे, साखरेमध्ये उंदरांच्या विष्ठेचे अंश असल्याचा आरोप तसेच सडलेली फळे पुरविण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. बालके तसेच गर्भवती आणि स्तनदा मातांना दिला जाणारा पोषण आहार हा आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील विषय असल्याने या प्रकाराची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### तक्रार करणाऱ्या मदतनीस महिलेवर दबाव?

या प्रकरणात अंगणवाडी मदतनीस उर्मिला पारधी यांनी दूषित अन्नाचे फोटो आणि इतर पुराव्यांसह संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र तक्रार केल्यानंतर त्यांना वरिष्ठांकडून धमकी, शिवीगाळ आणि मानसिक त्रास सहन करावा लागल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या दबावामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे चौकशी होणे आवश्यक असून, संबंधितांकडून अधिकृत स्पष्टीकरण मिळाल्यानंतरच आरोपांची सत्यता स्पष्ट होणार आहे.

### कागदोपत्री वाटपाचा आरोप

काही पात्र लाभार्थ्यांना ओळखपत्र किंवा अन्य कारणे पुढे करून पोषण आहारापासून वंचित ठेवण्यात आले; मात्र कागदोपत्री त्यांच्या नावावर आहाराचे वाटप दाखवण्यात आल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. या आरोपांचीहीस्वतंत्रचौकशीकरण्याची मागणी करण्यात आली आहे.आता चौकशीच्या अहवालाकडे लक्ष केंद्राच्या निर्देशानंतर राज्य शासन आणि संबंधित जिल्हास्तरीय यंत्रणा या प्रकरणात नेमकी कोणती कारवाई करते, तसेच तक्रारीतील आरोप चौकशीत कितपत सिद्ध होतात, याकडे रायगडचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये पोषण आहाराच्या पुरवठा साखळीची स्वतंत्र तपासणी करावी, निकृष्ट दर्जाचा आहार पुरवठा करणाऱ्यांची चौकशी करावी आणि दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण आणि दुर्गम भागातील अंगणवाड्यांमध्ये नियमित तसेच अचानक तपासणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. उर्मिला पारधी यांच्या राजीनाम्याची चौकशी करून त्यांना संरक्षण व न्याय मिळावा, अशी मागणीही तक्रारदारांनी केली आहे.

---

## निवडक



### ई-पोस्टर सादरीकरण स्पर्धा

**नवीन पनवेल :** श्री डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, नवीन पनवेल यांच्या वतीने इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन, रायगड शाखेच्या सहकार्याने जागतिक फार्मासिस्ट दिननिमित्त राष्ट्रीय स्तरावरील ई-पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेची संकल्पना निरोगी भविष्यासाठी फार्मासिस्टचे सक्षमीकरण अशी होती.या स्पर्धेला देशभरातील विविध शैक्षणिक संस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण १०५ संघ आणि सुमारे २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी ई-पोस्टरच्या माध्यमातून वैज्ञानिक ज्ञान, सर्जनशीलता, नाविन्यपूर्ण कल्पना, संशोधनवृत्ती आणि सादरीकरण कौशल्य प्रभावीपणे प्रदर्शित केले. स्पर्धेत एनएमआयएमएस हैदराबाद; ओरिएंटल कॉलेज ऑफ फार्मसी, सानपाडा; संदीप इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस, नाशिक; तसेच डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ फार्मसी, विलेपार्ले या संस्थांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उल्लेखनीय कामगिरी करत विविध पारितोषिके मिळवली. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. आशिष जैन, प्राचार्य धनराज विसपुते, अध्यक्ष; आणि संगीता विसपुते, सचिव, आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.




### परतीच्या पावसामुळे वीजपुरवठा खंडित

**| पाताळगंगा |** खालापूर तालुक्यात परतीच्या पावसाने गेल्या दोन दिवसांपासून जोरदार हजेरी लावली असून, वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तालुक्यातील विविध भागांत अनेक ठिकाणी वृक्ष उन्मळून पडल्याने रस्त्यांवरील वाहतुकीला अडथळा निर्माण झाला.काही ठिकाणी विजेचे खांब पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दोन दिवसांपासून सायंकाळच्या सुमारास पावसाचा जोर वाढत असल्याने कामावरून घरी परतणाऱ्या नागरिकांची मोठी तारांबळ उडत आहे. मुसळधार पावसामुळे दुचाकीस्वारांसह वाहनचालकांना रस्त्यावरून मार्गक्रमण करताना अडचणी येत आहेत. विजेचे पोल पडल्याने काही भागांतील वीजपुरवठा खंडित झाला आहे. परतीच्या पावसामुळे शेतीसह मालमत्तेचेही नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास आणखी नुकसान होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.



### वन विभागाची चौकी समस्येच्या गर्तेत

**सुतारवाडी :** कोलाड नाक्यावर अनेक वर्षापासून वन विभागाची तपासणी चौकी आहे. आता ती मोठ्या समस्येच्या गर्तेत सापडली आहे. तपासणी चौकी आता असून नसल्या सारखी सध्या पाहावयास मिळत आहे. कोलाड नाक्यावर गेल्या अनेक वर्षापासून सहा ते नऊ गुंठे शासनाची जमीन असलेल्या जागेत तपासणी चौकी बांधलेली आहे. माणगावकडून येणारी तसेच रोहा नागोठणेकडे जाणारी अवैद्य लाकडाची वाहतूक या ठिकाणी तपासले जायची. मात्र, आता पनवेल ते इंदापूर रस्ता रुंदीकरणात या तपासणी चौकी समोर मोठा पूल झाला आहे. त्यामुळे तपासणी चौकी खाली दिसत आहे. वाहतूक पुलावरून वळविण्यात आल्यामुळे लाकडाची अवैध वाहतूक गेली तर काहीच थांग पत्ता लागत नाही. काही दिवसांपूर्वी खांब-नागोठणे नजीक लाकडाची अवैद्य वाहतूक करणारा ट्रक पकडला होता. ही तपासणी चौकी इतरत्र हलवली तर अवैद्य लाकडाची वाहतूक होत राहणार आहे.

---

## शाळेत चित्रकला स्पर्धा उत्साहात




**| हमरापूर | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील हमरापुर राजीप शाळेत सेवा संकल्प अभियान उपक्रम अंतर्गत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राजिप व शिक्षण विभाग त्यांच्या वतीने सेवा संकल्प अभियान उपक्रमातंर्गतफ संपूर्ण जिल्ह्यांतील शाळांमध्ये चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राजिप शाळा शाळा हमरापूर केंद्र येथेही सदर उपक्रमातंर्गत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर चित्रकला स्पर्धेसाठी पेण पंचायत समितीच्या सभापती स्मिता पाटील यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमोद पाटील, शिक्षण व्यवस्थापन समिती अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य युवराज म्हात्रे आदी उपस्थित होते. सदर चित्रकला स्पर्धेचे आयोजनास मुख्याध्यापक विठोबा पाटील, मंदाकीनी पाटील व सुनंदा खाडे यांचे सहकार्य लागले.

## जेएसएमच्या विद्यार्थ्यांकडून समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता




**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अनंत चतुर्दशीनंतर समुद्रकिनाऱ्यावर जमा झालेला निर्माल्य, प्लास्टिक व इतर कचरा हटवून समुद्रकिनारा स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने जेएसएम. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अलिबाग समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड, डॉ. पंकज घरत, प्रा. अश्विनी आठवले तसेच महाविद्यालयातील एन. एस. एस. स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. स्वयंसेवकांनी समुद्रकिनाऱ्यावरील प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, कागद, निर्माल्य व अन्य कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड.गौतम पाटील यांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले.

अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर समुद्रकिनाऱ्याचे पर्यावरणीय संतुलन राखणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता ठेवणे आणि नागरिकांमध्ये स्वच्छ समुद्रकिनारा-सुंदर अलिबाग या संकल्पनेबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील व उपप्राचार्य डॉ. प्रविण गायकवाड यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता ही केवळ एका दिवसाची जबाबदारी नसून पर्यावरण संवर्धनाची सातत्यपूर्ण चळवळ आहे, असे प्रतिपादन केले. एन. एस. एस. स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला.

---

### मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन

**पनवेल :** कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनोळखी पुरुषाचा मृत्यू झाला असून, अद्याप त्याची ओळख पटलेली नाही. या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी कामोठे पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे.संबंधित इसमाचे वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे, रंग सावळा, डोक्याचे केस पांढरे व वाढलेले, उंची सुमारे ५ फूट ६ इंच आणि शरीरयष्टी सडपातळ आहे. मृत्यूसमयी त्याच्या अंगावर कोणतेही कपडे नव्हते. सदर इसमाला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित करण्यात आले. त्याच्या नातेवाईकांबाबत अद्याप कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्याच्या नातेवाईकांबाबत कोणाला माहिती असल्यास कामोठे पोलीस ठाणे ८६५५३५४११४ किंवा जयेंद्र माने ८१०८८९९५९५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.

### जनावरे वाहतूक; गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** टेम्पोमध्ये जनावरांची दाटीवाटीने कोंबून वाहतूक केल्याप्रकरणी अखिल शाह यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वाहन क्रमांक एम एच ४७ बीवाय ४८२७ चा टेम्पो चालक शहा यांनी टेम्पोमध्ये १६ जनावरे परवान्यामध्ये नमूद वजन क्षमतेपेक्षा जास्त वजनाची जनावरांना क्रूरतेची वागणूक दिली. या प्रकरणी पोलिसांनी टेम्पो आणि जनावरे ताब्यात घेतली आहेत.

## साखर शाळेचा स्वच्छता अभियान उपक्रम

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

आक्षी-साखर येथील समुद्र किनाऱ्यावर आक्षी ग्रामपंचायत, सागरी सीमा मंच, कांदळवन सुरक्षा समिती आणि रायगड जिल्हा परिषद शाळा साखर यांचे संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२६) सप्टेंबर रोजी स्वच्छता अभियान हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे जर आपला परिसर स्वच्छ राहिला तरच आपले आरोग्य उत्तम राहील हा संदेश समाजात जाण्यास मदत होईल.तसेच विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक असून त्यांच्या अंगी लहानपणापासूनच स्वच्छतेचे महत्त्व अंगी बिंबवावे तसेच समाजसेवा घडावी हा यामागील मुख्य उद्देश आहे. सदर अभियानात आक्षी ग्रामपंचायत सरपंच रश्मी पाटील, सागरी सीमा मंच सदस्य, कांदळवन सुरक्षा रक्षक समिती कर्मचारी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तेजस तांडेल, सदस्य हरेश्वर गोतकर, सामाजिक कार्यकर्ते कल्पेश वैद्य, मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, शिक्षिका स्मिता चिखले ग्रामपंचायत कर्मचारी सागर कवळे, मुजावर तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.शेवटी ग्रामपंचायत तर्फे सर्वांना अल्पोपहार देऊन अभियानाची सांगता करण्यात आली.



## वावोशी फाटा येथे सौरऊर्जा जनजागृती




**| वावोशी | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या खोपोली उपविभागाच्या वतीने उपकार्यकारी अभियंता वाघमोडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वावोशी फाटा येथे सौरऊर्जा योजनांबाबत जनजागृती व नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील वीजग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरामध्ये १०० युनिटच्या आत वीज वापर असलेल्या ग्राहकांना प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप (स्मार्ट) सोलर योजना तसेच अन्य शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. सौरऊर्जा प्रकल्पासाठी आवश्यकनोंदणीप्रक्रिया, शासनाकडून मिळणारे अनुदान, रूफटॉप सोलरचे फायदे, वीजबिलात होणारी बचतीचे फायदे याबाबत ग्राहकांना मार्गदर्शन सांगण्यात आले. यावेळी इच्छुक ग्राहकांची सोलर रूफटॉप योजनेसाठी ऑनलाइन नोंदणीही करण्यात आली. या शिबिरात वावोशी फाटा, शिरवली, जांभीवली, गारमाळ, गोरठण, आपटी, तळाशी, राणसई, दांडवाडी, नंदनपाडा आदी विभागातील अनेक वीजग्राहकांनी सहभागी होत योजनांची माहिती घेतली. सौरऊर्जा योजनांमुळे वीजबिलात बचत होण्यास मदत होणार असल्याने ग्राहकांनी समाधान व्यक्त केले.

> सौरऊर्जेच्या वापरामुळे पर्यावरणाचे संरक्षण होण्यासह वीजबिलात मोठी बचत होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ग्राहकांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वावोशी येथील कार्यालयाला भेट देऊन सौरऊर्जा योजनांची माहिती घ्यावी आणि या योजनांचा लाभ घ्यावा.
> -वाघमोडे , खोपोली उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता



● श्री. गणेश मित्रमंडळ मुनवली, ता अलिबाग येथील साखरचौथ गणपतीची आकर्षक मूर्ती.



● श्री. प्रल्हाद पांडुरंग वाघमारे, मु. वायशेत, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी साखरचौथ गणरायाची विराजमान सुबक मूर्ती. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)

---

वडाच्या झाडाखाली रंगणारे बालपण इतिहासजमा | पारंब्यांवर झुलणारे बालपण स्मृतींच्या झोक्यावर

## शहरीकरणामुळे निसर्गाशी मुलांची नाळ तुटली

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

संध्याकाळची वेळ... घराजवळील एका केबलच्या लोंबकळणाऱ्या वायरीला धरून काही चिमुकले झोका घेत खेळत होती. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. पण ते दृश्य पाहताच एका ज्येष्ठाच्या तोंडून नकळत शब्द बाहेर पडले, अरे, आमच्या वेळी अशी वायर नव्हती रे... वडाच्या पारंब्या होत्या!

आणि क्षणभरात काळ जणू काही दशकांमागे फिरून गेला... एकेकाळी रेवदंडा, चौल, आग्राव, थेरोंडा आणि परिसरातील गावांमध्ये वडाचे एखादे भलेमोठे झाड म्हणजे मुलांचे आवडते ठिकाण असायचे.



त्या झाडाच्या पारंब्या म्हणजे नैसर्गिक झोकेच. शाळा सुटली की दप्तर घरात फेकायचे आणि मित्रांसोबतपारंब्यांवरझुलायलाधाव घ्यायची. कोण जास्त उंच झोका घेणार, कोण जास्त वेळ लटकणार, याच्या स्पर्धा रंगायच्या. पडून गुडघे फुटायचे, खरचटायचे; पण रडण्यापेक्षा पुन्हा झोका घेण्याचीच घाई असायची. आज गावातही चित्र बदलत आहे. शहरांची तर गोष्टच वेगळी. काँक्रीटच्या इमारती वाढल्या, मोकळी मैदाने कमी झाली, झाडे तोडली गेली आणि पारंब्यांचे झोके इतिहासजमा होत गेले. आजच्या मुलांना वडाच्या पारंबीवर झुलण्याचा अनुभवच नाही. त्यामुळे केबलच्या वायरी, लोखंडी साखळ्या किंवा एखादा दोरखंड हाच त्यांच्यासाठी झोका बनला आहे.

### मुले मोबाईलच्या स्क्रीनवर मग्न

मोबाईलच्या स्क्रीनवर बोटे फिरवणाऱ्या पिढीला पारंबीवर झुलताना मिळणारी मुक्त उंच भरारी कशी समजणार? त्या झोक्यांसोबत वाहणारा वारा, मित्रांचा कल्ला, झाडांच्या पानांची सळसळ आणि सूर्यास्ताच्या साक्षीने रंगणारे बालपण अनुभवण्याचे भाग्यच त्यांना लाभलेले नाही.

रेवदंड्यातील अनेक ज्येष्ठ नागरिक आजही जुन्या आठवणी सांगताना भावूक होतात. त्या पारंब्या फक्त झोके नव्हत्या, ते आमचे बालपण होते, असे ते हळहळत सांगतात. कारण त्या झाडाखालीच मैत्री जुळली, भांडणे झाली, पुन्हा सुलह झाली आणि आयुष्यभरासाठी जपण्यासारख्या आठवणी निर्माण झाल्या. आज मुलांना खेळण्यासाठी महागडी उद्याने, आकर्षक खेळणी आणि आधुनिक साधने मिळाली आहेत; पण निसर्गाच्या कुशीत मिळणारा निष्पाप आनंद हरवला आहे. विकासाच्या वेगवान प्रवाहात आपण मुलांना सुविधा दिल्या, पण त्यांच्याकडून बालपणाचा एक सुंदर तुकडा नकळत हिरावून घेतला का, हा प्रश्न केबलच्या वायरीला झोका समजून खेळणाऱ्या चिमुकल्यांकडे पाहिल्यावर मनाला चटका लावून जातो.वडाची पारंबी, झाडाची सावली, मित्रांचा घोळका आणि मातीचा सुगंध... या गोष्टी आजही अनेकांच्या स्मृतीत जिवंत आहेत. म्हणूनच केबलच्या वायरीवर झुलणाऱ्या त्या चिमुकल्यांकडे पाहताना प्रत्येकाच्या मनात एकच भावना दाटून येते.खरंच... आपलं बालपण किती सुंदर होतं! पारंब्या अजूनही झाडांना आहेत कदाचित; पण त्यावर झुलणारं निष्पाप बालपण मात्र, काळाच्या ओघात कुठेतरी हरवून गेले आहे.

---

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **O'NEST Group of Hotels** येथे हाऊसकीपर, वेटर, ऑल राऊंडर शेफ, तातडीने हवे. ठिकाण: अलिबाग/रत्नागिरी. संपर्क: ९९७५५१६१२३.
- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा WhatsApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- **अलिबाग एसटीस्टॅन्डजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. संपर्क : ९७६४५४८६७९
- **झेरॉक्स दुकानात मराठी टायपिंगसाठी** मुलगी पाहिजे. संपर्क : ९९२१५५०१२९
- जन्नावार हॉस्पीटल चेंढरे अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८० ३४५०९
- **Vacancy for Store Manager in furniture Store** Experience in Sales - 5+ years, Salary - 40,000 per Mouth, Location Zirad. Contact - 9823585321
- **Vacancy in Furniture Factory as a office boy/girl,** Education - Graduation, Experience 3-4 years,Salary 20,000 per month, Location : Bamansure, Chondli. Contact - 9823585321.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# निवडक

## इंग्लंडचा श्रीलंकेवर मोठा विजय

**लंडन :** श्रीलंका क्रिकेट संघाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील अंतिम आणि निर्णायक सामन्यात इंग्लंडनं २२३ धावांनी मोठा विजय नोंदवला. या एकतर्फी विजयासह इंग्लंडनं वनडे मालिका २-१ नं जिंकली. सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या इंग्लंडनं आपल्या निर्धारित ५० षटकांत ७ गडी



गमावून ३५५ धावांचा डोंगर उभा केला, तर श्रीलंकेचा संघ अवघ्या २९.१ षटकांत १३२ धावांवर गारद झाला. इंग्लंडच्या या मोठ्या खेळीचा पाया सलामीवीर टॉम बँटननं रचला, ज्यानं आपल्या झंझवाती शतकानं श्रीलंकेच्या गोलंदाजांची धुलाई केली. बँटननं १०५ चेंडूंचा सामना करत १६ चौकार आणि ५ षटकारांसह १२६ धावा केल्या. मधल्या फळीत, कर्णधार हॅरी ब्रुकनं ६६ चेंडूंमध्ये ७७ धावा केल्या, तर यष्टीरक्षक-फलंदाज जॉर्डन कॉक्सनं ५२ चेंडूंमध्ये ७६ धावांची वेगवान खेळी केली. खालच्या फळीतील विल जॅक्स (२५ धावा) आणि जेमी ओव्हरटन (२१ नाबाद) यांच्या उपयुक्त खेळींमुळे इंग्लंडने ३५५ धावांपर्यंत मजल मारली.

## कबड्डी क्षेत्रात पुण्याचा दबदबा

**पुणे :** पुणे शहराला देशात सांस्कृतिक व शैक्षणिक राजधानी म्हणून ओळखले जाते, त्याचप्रमाणे कबड्डी क्षेत्राची राजधानी म्हणूनही ओळखले जाते. अनेक कबड्डी खेळाडूंना आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक मिळालेत, तसेच प्रो-कबड्डी सारख्या



स्पर्धेमुळे देखील खेळाडूंना फार मोठा न्याय मिळाला आहे, असे प्रतिपादन पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवीन किशोर राम यांनी केले. पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने व सतेज संस्था बाणेर यांच्या वतीने आयोजित कुमार व कुमारी गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन नवल किशोर राम यांच्या हस्ते झाले. कबड्डीच्या मैदानात ताकद, चपळाई, डावपेच आणि जिद्दीची खरी कसोटी पाहायला मिळणार असून, तब्बल २३० संघ या जिल्हास्तरीय स्पर्धेत आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. यामध्ये कुमार गटातील मुलांचे १६८ संघ आणि कुमारी गटातील मुलींचे ६२ संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेचे पंच प्रमुख म्हणून अनिल यादव यांनी कामकाज पाहिले, एकुण ५० पंच काम पहात होते.

## सोनमचा कोल्हापूरात भव्य सत्कार



**कोल्हापूर :** जपानमध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत महिलांच्या १० मीटर एअर रायफल नेमबाजी प्रकारात कोल्हापूरची कन्या सोनम उत्तम मस्कर हिने रौप्यपदक पटकावून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची आणि कोल्हापूर जिल्ह्याची मान उंचावली आहे. या ऐतिहासिक आणि दैदिप्यमान यशानंतर कोल्हापूरच्या मातीत परतलेल्या सोनमचं क्रीडाप्रेमी, नागरिक आणि पदाधिकाऱ्यांच्या वतीनं अत्यंत जल्लोषात स्वागत करण्यात आले. या गौरवशाली कामगिरीची दखल घेत कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात एका विशेष सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होते. याप्रसंगी कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते सोनमचा सत्कार करण्यात आला. पालकमंत्र्यांनी सोनमच्या निवासस्थानी प्रत्यक्ष भेट देऊन तिच्या आई-वडिलांचाही विशेष गौरव केला होता. योगायोगाने 'कन्या दिना'चे औचित्य साधून पार पडलेल्या या कार्यक्रमात सोनमच्या यशानं संपूर्ण कोल्हापूर जिल्हा आणि महाराष्ट्र अभिमानाने भारावून गेला असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

## तिरंदाजीमध्ये साहिल, चिकिताचा सुवर्णवेध

**नागोया :** आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये, भारतीय तिरंदाज चिकिता तनिपार्थी आणि साहिल जाधव यांनी दक्षिण कोरियाचा रोमांचक शूट-ऑफमध्ये पराभव करून कंपाऊंड मिश्र सांघिक प्रकारात सुवर्णपदक पटकावले. अत्यंत तणावपूर्ण अंतिम सामन्यात भारतीय जोडीने संयम



राखला. गुण समान झाल्यामुळे सामना शूट-ऑफपर्यंत गेला आणि तिथे निर्णायक क्षणी बाजी मारत त्यांनी सुवर्णपदक निश्चित केले. चिकिता आणि साहिल यांनी अंतिम सामन्याची दमदार सुरुवात केली आणि दोघांनीही त्यांच्या सुरुवातीच्या शॉट्समध्ये ३९;१०३९; गुण मिळवले. दक्षिण कोरियाच्या पार्क आणि चोई यांनीही अचूक ३९;१०३९; गुण मिळवून त्यांना चोख प्रत्युत्तर दिले, ज्यामुळे सुरुवातीच्या चार बाणांनंतर गुणसंख्या २०-२० अशी बरोबरीत राहिली. पहिल्या फेरीत भारताची दमदार कामगिरी सुरूच राहिली आणि भारताने सुवर्णपदकाची कमाई केली.

## टेनिस स्पर्धेत युवा खेळाडूंचा जलवा

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखानातर्फे व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन्स पुणे यांच्या सहकार्याने आयोजित एआयटीए, एमएसएलटीए, पीएमडीटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एमएसएलटीए-पीएमडीटीए चॅम्पियनशीप सिरीज (१२ वर्षाखालील) टेनिस स्पर्धेत मुलांच्या गटात श्रेयश चौतमहल, आरुष बालसुब्रमण्यम, देवांश चव्हाण, वेदांत अगरवाल यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. पीवायसी हिंदू जिमखाना व डेक्कन जिमखाना टेनिस कोर्ट येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये पहिल्या फेरीत मुलांच्या गटात अव्वल मानांकित श्रेयश चौतमहल याने विवान डीक्करचे आव्हान ६-१, ६-१ असे मोडीत काढले. तामिळनाडूच्या आरुष बालसुब्रमण्यम याने महाराष्ट्राच्या रियांश सिंगचा ६-०, ६-१ असा सहज पराभव केला.

# भारताला विजयासाठी ४०६ धावांचे आव्हान

**|| वेस्ट इंडिजच्या इतिहासात पहिल्यांदाच धावांचा || डोंगर तीन फलंदाजांनी झळकावली शतके**

| गुवाहाटी | वृत्तसंस्था |

भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील दुसरा वनडे सामना गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियम येथे खेळवण्यात येत आहे. या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. यानंतर प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या इंडिजच्या फलंदाजांनी तुफान फटकेबाजी केली. वेस्ट इंडिजच्या फलंदाजांना रोखण्यात भारतीय गोलंदाजांना अशरश: अपयश आले. वेस्ट इंडिज संघाने ५० षटकांत ७ बाद तब्बल ४०५ धावांचा डोंगर उभा केला आहे. आता भारतीय संघ ४०६ धावांचे आव्हान पार करतं का? ते पाहणं आता औत्सुक्याचे आहे. दरम्यान, वेस्ट इंडिज संघातील तब्बल तीन फलंदाजांनी शतक झळकावलं आहे. यामध्ये जॉन कॅम्पबेल, शाय होप आणि अमीर जांगू यांचा




समावेश आहे.

प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या इंडिजच्या फलंदाजांची बऱ्यापैकी सुरुवात केली. सलामीवर जॉन कॅम्पबेल आणि केसी कार्टी यांनी सुरुवातीलाच आक्रमक फलंदाजी करण्याचा बेत आखला होता. पण उंच फटका मारण्याच्या नादात केसी कार्टी हा ९ धावा करुन बाद झाला. विशेष म्हणजे त्याने दोन चौकार मारले. केसी कार्टी प्रसीध कृष्णा याच्या चेंडूवर उंच फटका मारत असताना नमन धीर याने झेल टिपला. यामुळे पाचव्या षटकात वेस्ट इंडिजला पहिला झटका बसला.

जॉन कॅम्पबेल आणि शाय होप यांची ११० धावांची भागिदारी ३७ धावांवर पहिला बाद अशी वेस्ट इंडिजची अवस्था झाली. पण त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या शाय होप याने जॉन कॅम्पबेल याच्यासोबत तब्बल ११० धावांची भागिदारी केली. या दरम्यान जॉनने चौकार आणि षटकांचा अक्षरश: पाऊस पाडला. यामध्ये ९ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश आहे.

### होपचे २० वे शतक

होपने ९० चेंडूत त्याचे वन डेतील २० वे शतक पूर्ण केले आणि भारताविरुद्धचे ते त्याचे चौथे शतक ठरले. त्याने ब्रायन लाराला ( १९ शतकं) मागे सोडले.

दरम्यान, १९ व्या षटकांत गुरनूर ब्रार याच्या चेंडूवर जॉन झेलबाद झाला. याचा देखील झेल नमन धीर याने टिपला.

जॉन कॅम्पबेल बाद झाल्यानंतर शाय होप याने अमीर जांगू याच्यासोबत तब्बल १८२ धावांची भागिदारी केली. भारतीय गोलंदाजांनी इंडिजच्या फलंदाजांचा बळी घेण्यासाठी पूरेपूर प्रयत्न केले. पण काही केल्या यश मिळत नव्हतं. अखेर ४० व्या षटकांत भारतीय संघाला मोठं यश मिळालं. कुलदीप यादवने शाय होप याला झेलबाद केले. त्याने ९४ चेंडूत १०४ धावा केल्या. यामध्ये ८ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश आहे.

जांगून ७० चेंडूत त्याचे दुसरे शतक झळकावले आणि त्यानंतर त्याने धावांचा वेग वाढवण्याचा प्रयत्न केला. त्यात रवींद्र जडेजाला विकेट मिळाली. जांगू ७७ चेंडूत १३ चौकार व ३ षटकारांसह ११४ धावांवर माघारी परतला. कुलदीपने आणखी एक विकेट घेताना किमो पॉलला ( ३) माघारी पाठवले आणि वन डे तील २०० विकेट्स पूर्ण केल्या. मोहम्मद शमीनंतर सर्वात वेगाने २०० विकेट्स घेण्याचा मान त्याने पटकावला. विंडीजने नंतर विकेट गमावल्या खऱ्या, परंतु त्यांनी ४०० धावांचा टप्पा पार करून इतिहास घडवला. त्यांनी प्रथमच वन डेत ४०० धावा केल्या आणि भारताविरुद्ध ७ बाद ४०५ धावांचे विशाल आव्हान उभे केले आहे.

## सर्वेशची उंच उडीत ऐतिहासिक कामगिरी

| आयची-नागोया | वृत्तसंस्था |

आशियाईक्रीडास्पर्धेतभारतीय ॲथलेटिक्ससाठी रविवारचा दिवस संस्मरणीय ठरला. महाराष्ट्राच्या सर्वेश कुशारेने पुरुषांच्या उंच उडीत रौप्यपदक जिंकून आपली प्रदीर्घ प्रतीक्षा संपवली. भारताने ५६ वर्षांनंतर आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या उंच उडी प्रकारात पदक जिंकले आहे. यापूर्वीचे कांस्यपदक १९७० च्या बँकॉक आशियाई क्रीडा स्पर्धेत भीम सिंग यांनी जिंकले होते.

३१ वर्षीय भारतीय खेळाडूने अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी केली, परंतु तो चायनीज तैपेईच्या



फू चाओ-ह्सुआनकडून थोडक्यात पराभूत झाला होता.

२०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकलेल्या सर्वेशने स्पर्धेच्या बहुतांश भागात आघाडी घेतली होती आणि तो सुवर्णपदकाचा प्रबळ दावेदार होता. मात्र, तो आपल्या पहिल्या प्रयत्नात २.२५ मीटर उंचीचा अडथळा पार करु शकला नाही. दुसरीकडे, फू चाओ-ह्सुआनने आपल्या पहिल्याच प्रयत्नात २.२५ मीटरची उंची पार करुन आघाडी घेतली.

सर्वेशने हार मानली नाही आणि आपल्या दुसऱ्या प्रयत्नात २.२५ मीटरचा टप्पा यशस्वीपणे पार केला. मात्र, तो दुसऱ्या स्थानावर घसरला होता. त्यानंतर तो सुवर्णपदकासाठी आव्हान देऊ शकला नाही आणि त्याला रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. नाशिकमधील देवरगावचा रहिवासी असलेल्या सर्वेशचे हे आशियाई क्रीडा स्पर्धेतील पहिलंच पदक आहे.

## मुंबई इंडियन्सच्या नवीन प्रशिक्षकाची घोषणा

**मुंबई :** मुंबई इंडियन्स फ्रँचायझीच्या संघाने त्यांच्या नव्या पर्वाची सुरुवात केली. फ्रँचायझीने त्यांच्या मुख्य प्रशिक्षकपदी दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू मार्क बाऊचर याची निवड केली आहे. फ्रँचायझीने रॉबिन सिंग याने संघासाठी खेळाडू आणि प्रशिक्षक म्हणून दिलेल्या योगदानाबद्दल त्याचे आभार मानले आहेत. २०१० पासून मुंबई इंडियन्सचा भाग असलेला रॉबिन सिंग हे पाच वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या मुंबई इंडियन्सच्या इंडियन प्रीमिअर लीग मोहिमांमध्ये सहभागी राहिला आहे.

## भारतीय दोन बॉक्सर अंतिम फेरीत

| नागोया (जपान) | वृत्तसंस्था |

आशियाई क्रीडा स्पर्धेत परवीन हुडा (६५ किलो महिला) आणि अंकुश पांघल (८० किलो पुरुष) या दोन बॉक्सरनी अंतिम फेरीत प्रवेश करून रौप्यपदक पटकावले. आता ते अंतिम फेरीत सुवर्णपदकासाठी लढतील. ९० किलोहून अधिक पुरुष गटात, भारताचा नरिंदर उपांत्य फेरीत पराभूत झाल्याने त्याला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. परवीन हुडा ही २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय बॉक्सर ठरली. तिने उपांत्य फेरीत चीनच्या शू लीचा ५-० असा पराभव केला. या विजयामुळे परवीन आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी तिसरी भारतीय महिला बॉक्सर ठरली. आशियाई क्रीडा स्पर्धेत आतापर्यंत केवळ एकाच भारतीय महिला बॉक्सरने सुवर्णपदक जिंकले आहे. मेरी कोमने २०१४ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत ही कामगिरी केली होती.

अंतिम फेरीत परवीनचा सामना चायनीज तैपेईच्या चेन निएन चिनशी होईल. पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात, अंकुशने विद्यमान ७५ किलो विश्वविजेता फजलिद्दीन एर्किनबोएव्हला ४-१



ने पराभूत करून शानदार पुनरागमन केले. अंकुशने उत्कृष्ट बॉक्सिंगचे प्रदर्शन करत या उझबेक बॉक्सरला स्पर्धेतून बाहेर केले. एर्किनबोएव्हने पहिली फेरी ४-१ ने जिंकली. दुसऱ्या फेरीत, अंकुशने पुनरागमन करत ३-२ ने विजय मिळवला. अंतिम फेरीतही त्याने काही प्रभावी ठोसे मारून आपला विजय निश्चित केला. पुरुषांच्या ९०+ किलो वजनी गटात उपांत्य फेरीत नरेंद्र विश्वविजेता अबेक ओरलबेकडून पराभूत झाला. भारतीय बॉक्सर तिन्ही फेऱ्यांमध्ये पराभूत झाला आणि कझाक बॉक्सर ५-० ने विजयी ठरला. गेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तुलनेत भारताने यावेळी बॉक्सिंगमध्ये चांगली कामगिरी केली आहे. गेल्या वेळी भारताने या खेळात एक रौप्य आणि तीन कांस्यपदकांसह चार पदके जिंकली होती. यावेळी दोन रौप्य आणि चार कांस्य अशी एकूण सहा पदके निश्चित झाली आहेत. चार कांस्यपदकांपैकी तीन पदकांचे रंग बदलण्याची शक्यता आहे.

## चेस ऑलिम्पियाडमध्ये भारताची रौप्य,कांस्यपदकावर मोहोर

| समरकंद | वृत्तसंस्था |

समरकंद येथे झालेल्या ४६ व्या चेस ऑलिम्पियाड २०२६ मध्ये, दोन्ही भारतीय संघांनी दमदार कामगिरी करत ओपन गटात रौप्यपदक आणि महिलांच्या गटात कांस्यपदक जिंकले. ओपन गटात, यजमान उझबेकिस्तानने मायदेशात आपले दुसरे ऑलिम्पियाड सुवर्णपदक जिंकले आणि भारत दुसऱ्या स्थानावर राहिला. जर्मनीने कांस्य पदक जिंकून पदकांचे मानकरी ठरले. भारताचा हंगेरीविरुद्धचा अंतिम फेरीतील सामना २-२ असा बरोबरीत सुटला; यात जागतिक विजेत्या गुकेश



डोम्माराजूला हंगेरीच्या ग्रँडमास्टर ग्लेब डुडिनकडून पराभव पत्करावा लागला. मात्र, ग्रँडमास्टर अर्जुन एरिगासीने ग्रँडमास्टर पीटर लेकोचा पराभव केल्यामुळे भारताला सामना बरोबरीत सोडवता आला आणि रौप्यपदक निश्चित करता आले. उझबेकिस्तानने अंतिम फेरीत युक्रेनचा २.५-१.५ असा पराभव करून सुवर्णपदक निश्चित केले. निर्णायक सामन्यात रोमन देह्तियारोव्हचा पराभव करून यजमान संघासाठी मुखिद्दिन मदामिनोव्ह विजयाचा शिल्पकार ठरला. उझबेकिस्तान भारत आणि जर्मनीपेक्षा दोन गुणांनी पुढे राहिले, तर टाय-ब्रेकच्या आधारे भारताने दुसरे स्थान पटकावले. नेदरलँड्सचा २.५-१.५ असा पराभव करून जर्मनीने तिसरे स्थान मिळवले. यात ग्रँडमास्टर मॅथियास ब्ल्यूबॉमने ग्रँडमास्टर जॉर्डन व्हॅन फॉरेस्टचा पराभव केला. दरम्यान, जॉर्जियाविरुद्धचा अंतिम फेरीतील रोमांचक सामना २-२ असा बरोबरीत सुटल्यामुळे भारताच्या महिला संघाने कांस्यपदक जिंकले. जॉर्जियाच्या इंटरनॅशनल मास्टर मेरी अराबिद्झेविरुद्ध कठीण परिस्थितीतून सामना बरोबरीत सोडवून भारताच्या इंटरनॅशनल मास्टर सविता श्रीने महत्त्वाची भूमिका बजावली आणि भारताला पदक मिळवून देण्यात मदत केली. व्हिएतनामचा ३-१ असा पराभव करून चीनने महिलांचे सुवर्णपदक जिंकले, तर पोलंडविरुद्धचा सामना २-२ असा बरोबरीत सुटल्यामुळे कझाकस्तानने रौप्यपदक पटकावले.

## नीरूच्या सुवर्णवेधामागे अश्विनीची साथ

| खरोशी | प्रतिनिधी |

जपान येथे पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची महिला ट्रॅप शूटिंगपटू नीरू धांडा यांनी अचूक नेमबाजीचे प्रदर्शन करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. त्यांच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारताचा तिरंगा आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात अभिमानाने उंचावला. नीरूच्या या सुवर्णयशात त्यांच्या अधिकृत फिजिओथेरपिस्ट अश्विनी पाटील यांचीही महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. खेळाडूची शारीरिक



तंदुरुस्ती, फिटनेस, रिकव्हरी आणि सर्वोत्तम कामगिरीसाठी आवश्यक शारीरिक तयारी यासाठी अश्विनी हिने पडद्यामागे सातत्याने मोलाची साथ दिली. नीरूचा अचूक सुवर्णवेध आणि अश्विनीची साथीमुळे या यशाला एक विशेष पैलू लाभला आहे. मैदानावर पदकासाठी झुंज देणाऱ्या खेळाडूच्या यशामागे फिजिओथेरपिस्टसारख्या तज्ज्ञांची असलेली महत्त्वाची भूमिका यानिमित्ताने अधोरेखित झाली आहे. नीरूच्या शानदार सुवर्ण कामगिरीबद्दल तसेच त्यांच्या यशात योगदान देणाऱ्या फिजिओथेरपिस्ट अशिवनीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## कोल्हापूरचा जपानमध्ये डंका

| कोल्हापूर | प्रतिनिधी |

ग्रामीण भागातील गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळाल्यास ती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकू शकते, हे वैष्णवी आणि कल्याणी यांनी आपल्या कामगिरीतून दाखवून दिलं आहे. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही दोघींनी सराव, मेहनतीच्या बळावर रग्बीमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली.

एकीचे वडील रिक्षाचालक, तर दुसरीचे वडील खासगी सुरक्षारक्षक. प्रतिकूल परिस्थितीची कोणतीही पर्वा न करता पाडळी खुर्द गावच्या दोन लेकींनी मोठी मजल मारली आहे.




वैष्णवी पाटील आणि कल्याणी पाटील या दोघी जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत रग्बी या खेळात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या दोघींसह ग्रामीण भागातील शेकडो मुला-मुलींना रग्बी खेळाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्याचे काम प्रशिक्षक दीपक पाटील यांनी केले आहे. ग्रामीण भागातील गुणवत्ता शोधून त्यांना प्रशिक्षण देत त्यांनी अनेक खेळाडूंना पुढे जाण्याची संधी उपलब्ध करून दिली.आपल्या गावच्या लेकींनी देशाचे प्रतिनिधित्व करताना उत्तम कामगिरी करून पदक जिंकावं, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

**चीनविरुद्ध लक्ष्यभेदन करत जिंकले सुवर्णपदक | संघाची एकूण २३८ गुणाची कमाई**

# भारतीय धनुर्धरांची विश्वविक्रमी कामगिरी

| आयची-नागोया | वृत्तसंस्था |

भारताने बुधवारी आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ ची सुरुवात सुवर्णपदकाने केली. महिलांच्या कंपाऊंड तिरंदाजी संघाने अंतिम सामन्यात चीनला पराभूत करुन सुवर्णपदक पटकावले. ज्योती सुरेखा वेन्नम, पृथिका प्रदीप आणि चिखिता तनिपार्थी या त्रिकुटाने २३८ गुण मिळवून चीनला २३४ गुणांवर रोखले. यासह, भारताने महिलांच्या कंपाऊंड सांघिक २४-बाणांच्या सामन्यातील २३८ गुणांच्या विश्वविक्रमाची बरोबरी केली. या प्रकारातील यापूर्वीचा विश्वविक्रम दक्षिण कोरियाच्या नावावर होता.



अंतिमसामन्यात,चीननेसलग तीन ९ गुण मिळवले. प्रत्युत्तरात, चिखिता, पृथिका आणि ज्योती यांनी १०, १० आणि १० गुण मिळवून भारताला सुरुवातीलाच आघाडी मिळवून दिली. भारतीय संघानं पहिल्या फेरीत एकूण ६० गुण मिळवले, तर चीनला केवळ ५८ गुण मिळवता आले. त्यानंतर भारताने आपली आघाडी कायम ठेवली. सहा-बाणांच्या चार फेऱ्यांमध्ये भारतीय संघाने एकूण २३८ गुण मिळवले. चीनचा स्कोर २३४ होता, आणि भारताने अंतिम सामना चार गुणांच्या फरकाने जिंकला.

### भारताचे सातवे सुवर्णपदक

२०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील हे भारताचे सातवे सुवर्णपदक आहे. भारताच्या पदकांची एकूण संख्या ५३ झाली असून, त्यात सात सुवर्ण, २१ रौप्य आणि २५ कांस्यपदकांचा समावेश आहे. ॲथलेटिक्सने भारताला २४ पदकं मिळवून दिली आहेत, तर नेमबाजीने १४ पदकं मिळवून दिली आहेत. कबड्डीन दोन सुवर्णपदकं आणि स्क्वॅशनं भारताला तीन पदकं मिळवून दिली आहेत.

भारताच्या कामगिरीचे सर्वात उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे संघाने २४ पैकी २२ वेळा परफेक्ट १० गुण मिळवले, तर केवळ दोन वेळा ९ गुण होते. स्कोरकार्डनुसार, भारताने चारही एंड्समध्ये ६०, ५९, ५९ आणि ६० गुण मिळवले. चीननेही २३८ गुणांच्या विश्वविक्रमाची बरोबरी करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना केवळ २३४ गुणांपर्यंतच पोहोचता आले. भारताच्या २३८ गुणांमुळं थेट विक्रमाची बरोबरी झाली.

### ज्योती-पृथिका-चिखिताची सुवर्ण कामगिरी

ज्योती सुरेखा वेन्नम, पृथिका प्रदीप आणि चिखिता तनिपार्थी यांनी अंतिम सामन्यात दबावाखाली उत्कृष्ट कामगिरी केली. उपांत्य फेरीत दक्षिण कोरियाला २३४-२३३ नं हरवून अंतिम फेरीत पोहोचलेल्या भारतीय संघाने चीनविरुद्धही आपली लय कायम ठेवत सुवर्णपदक पटकावले.

महिलांच्या कंपाऊंड सांघिक २४-बाणांच्या सामन्यातील २३८ गुणांचा विश्वविक्रम यापूर्वी दक्षिण कोरियाच्या नावावर होता. दक्षिण कोरियाच्या संघाने २०१४ मध्ये इंचिओन इथे हा स्कोर गाठला होता. आता, भारताने त्या स्कोरची बरोबरी करुन इतिहास रचला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)